# ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

## वार्षिक वृत्त

### राष्ट्रीय सौर शके १९३९-४० (सन २०१७-१८)

## मनोगत

२०१७-१८ हे वर्ष बचत गटातून सुरू झालेल्या ग्रामीण स्त्री शक्तीच्या कामाचे २३ वे वर्ष! स्त्री शक्ती प्रबोधन ह्या विषयावर सातत्याने काम केल्यामुळे कधीतरी स्वतःला 'लाभार्थी' समजणाऱ्या स्थानिक महिला आता प्रबोधिनीच्या कार्यकर्त्या म्हणून पुढाकार घेऊन हे काम चालवत आहेत याचे समाधान आहे.

- आता आपला संपर्क शिवगंगा गुंजवणी खोऱ्यातील साधारण १०० गावात आहे. ज्या गावात दरमहा काहीतरी उपक्रम होतात अशी किमान ७० गावे तरी आहेत. बचत गटातून सुरू झालेले हे काम महिलांसाठी बचत गट, स्वयंरोजगार, आरोग्य, नेतृत्व-विकसन या अंगांनी वाढले तर 'आता पोरीला शिकवा' म्हणणारी आई तयार झाल्यामुळे किशोरी विकास, युवती विकास या अंगांनीही कामाला गती मिळाली. आंबवण्याच्या स्टरलाईट टेक फौंडेशनच्या जीवनज्योती महिला सबलीकरण केंद्राची जबाबदारी या वर्षी अजून वाढल्यामुळे युवतींच्या औपचारिक शिक्षणासाठीही भरीव काहीतरी करता आले.
- या वर्षी ६५ गावात ३२० बचत गटांद्वारे काम केले. ठरवूनच नवीन बचत गट दुर्गम भागात सुरू केले. हा भाग म्हणजे 'आम्हाला कर्ज नको' असं म्हणणारा वेल्हे, भोर तालुक्यातला डोंगराळ भाग! या वर्षी ३१ मार्च अखेर २६४ गटांचे आर्थिक हिशोब झाले. त्यात ४४१४ सभासद असून, त्यांनी गट सुरू झाल्यापासून २.७१ कोटी एवढी बचत केली, ६.७५ कोटी कर्ज दिले; त्यापैकी ३.८० कोटी ३१ मार्च अखेर येणे बाकी आहे. या बचत गटांमुळे तयार झालेल्या संपर्क साखळीमुळे ४०० महिलांना व ७०० युवतींना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली तर नेतृत्वाच्या योजलेल्या उपक्रमात २०० जणींनी विशेष संधी घेतली. गरोदर महिला तपासणी, गर्भाशय मुखाचा कॅन्सर या महिला आरोग्याच्या बरोबरीनेच यंदा दत्तात्रय दाताचा दवाखाना आंबवण्यात सुरू केला. ग्रामीण महिलांनी चौकटी बाहेर पाउल टाकायला सुरुवात करावी म्हणून छोट्या मोठ्या सहली व गाव पातळीच्या मेळाव्यांची योजना केलीच होती, तशी ती यशस्वी रीत्या पारही पडली.

**वर्षभरातील सहभागींची संख्या**

| | नियमित | मेळावे | | संपर्क गावे |
|---|---|---|---|---|
| | सहभागी | एकूण | सहभागी | |
| किशोरी | २३० | ११५ | २५०८ | ८० |
| युवती | १०९ | १ | ८० | ४० |
| महिला | ५७७७ | ९१ | २४९०६५ | |

- बालवाडी ८ ठिकाणी चालवली तर नव्या सुनांसाठी सुरु केलेला 'हिरकणी' उपक्रम यंदाही १० गावात १२० जणींच्या सहभागाने पार पडला. यातून कामाची नवी फळी उभी रहात आहे. त्यांनी मुलांच्या विकासाची जबाबदारी घेऊन गावातल्या मुलांचे खेळ घेणे, या 'नव चैतन्य' उपक्रमाची धुरा सांभाळली.
- किशोरी विकास उपक्रमात १० शाळांमधल्या किशोरींसाठी नियमित तासिका झाल्या. सुट्टीत हा संपर्क वापरून ११६ गावातल्या २५०८ मुला-मुलींपर्यंत पोचण्याचा विक्रमही केला. युवती विकासात ३ महाविद्यालये व गाव पातळीवर केलेल्या कार्यक्रमातून युवतींचा आत्मविश्वास तर वाढलाच पण त्यातून तयार झालेल्या युवतींनी किशोरी उपक्रम घ्यायला मदत केली.

## अनुक्रमणिका


* मनोगत
१. किशोरी विकास
२. युवती
३. बालवाडी
४. हिरकणी
५. नव चैतन्य गट
६. महिला
   ६.१ बचतगट
   ६.२ स्वयंरोजगार
   ६.३ आरोग्य
   ६.४ नेतृत्वविकसन
* विशेष लेख
१ नवरात्र मेळावे २०१७
२ नवा विक्रम : गावांमध्ये विज्ञान मेळावे
३ आत्मप्रचिती परिसंवाद



### ♦ ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे पदाधिकारी ♦

- अध्यक्ष — डॉ. रघुनाथ माशेलकर
- उपाध्यक्ष — डॉ. विजय केळकर, कि. बा. (अण्णा) हजारे
- कार्याध्यक्ष — श. बा. तथा रवि पंडित
- संचालक — डॉ. गिरीश श्री. बापट
- कार्यवाह — वि. शं./सुभाष देशपांडे

- वेल्ह्यातल्या जास्वंद गिरीकन्या निवासाचे हे चौथे वर्ष! यंदा २३ किशोरी व ३ युवती, ३ ताईंसोबत तिथे रहात होत्या. गेल्या वर्षी पेक्षा संख्या दीड पटीने वाढली. यंदा हे वसतिगृह आता एक विकास केंद्र बनून इतर अनेक उपक्रम तेथे झाले.
- हे सगळं काम झपाट्याने वाढताना त्यांच्यातला संवाद पूरक व्हावा म्हणून विविध पातळीवर एकत्र बैठका घेतल्या तर काही उपक्रमांचे नियोजन-निवेदन करायला बैठका उपयोगी पडल्या. या वर्षी दरमहा झालेल्या २८ बैठकींमधून ११७ जणींच्या सहभागाने हे काम पुढे सरकले!

या कामाला लागणारे अर्थसाहाय्य देश-विदेशातल्या अनेक दात्यांनी देणगी रूपाने दिले त्यामुळेच केवळ हे सारे सगळ्यांच्या मनातले काम प्रत्यक्षात उतरू शकले. या कामासाठी अथक प्रयत्न केलेल्या सगळ्यांमुळे गेल्या वर्षीपेक्षा यंदाचे काम अधिक खोलवर रुजले आहे, असे नक्कीच म्हणता येईल!

## बैठकीचे नाव व संख्या

| क्र. | बैठकीचे नाव | सभासद संख्या | क्र. | बैठकीचे नाव | सभासद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहविचार बैठक | १० | १५ | बालवाडी बैठक | ९ |
| २ | शिखर बैठक | ८ | १६ | नवचैतन्य दल बैठक | १७ |
| ३ | विभाग प्रमुख बैठक | १६ | १७ | किशोरी विकास बैठक | १६ |
| ४ | सुकाणू बैठक | २१ | १८ | युवती बैठक | ८ |
| ५ | नेतृत्व बैठक | १३ | १९ | जीवनज्योती बैठक | २ |
| ६ | स्वयंरोजगार बैठक शिखर बैठक | ५ | २० | वेल्हे केंद्र बैठक | ७ |
| ७ | स्वयंरोजगार बैठक (वेल्हे) | ७ | २१ | शिवापूर केंद्र बैठक | ६ |
| ८ | स्वयंरोजगार बैठक (शिवापूर) | ८ | २२ | सहनिवास बैठक | ७ |
| ९ | स्वयंरोजगार बैठक (आंबवणे) | १० | २३ | आर्थिक बैठक | ३ |
| १० | आरोग्य बैठक | ८ | २४ | कातकरी प्रकल्प बैठक | ६ |
| ११ | वेल्हे प्रबोधिका बैठक | ११ | २५ | एकल महिला बैठक | ४ |
| १२ | नव दिशा बैठक | १९ | २६ | किशोर विकास बैठक | ९ |
| १३ | नव चेतना बैठक | १७ | २७ | अर्थकारण बैठक | ३ |
| १४ | हिरकणी बैठक | १३ | २८ | स्वयंरोजगार बैठक (जीवनज्योती) | ५ |

• **सुकाणू गट** हा पूर्णवेळ स्त्री शक्तीचे काम करणारा गट. त्या गटाने हे सगळे काम केले. त्या गटातील सहभागी सदस्य : सुवर्णा गोखले, बागेश्री पोंक्षे, भारती खासबागे, आशा सुर्वे, भारती कामठे, अश्विनी ठाकर, तृप्ती कुलकर्णी, प्रतिभा स्वामी, रंजिता सरवदे, कुंदा खंडाळकर, सुरेखा दिघे, निर्मला कुंभार, शैला भोंडेकर, स्वाती शिंदे, किर्ती कोंडे, दिपाली कामठे, गंगुताई सांगळे, हिरा जोर्वेकर, कावेरी शिवरकर, आशा गोगावले, लता प्रभुमिराशी.

## ★ कामाचे हितचिंतक देणगीदार ★

श्री. अनंत सेटलवाड १५,००,०००/- एन. जी. परांजपे प्रतिष्ठान ३,७५,०००/- विजय देशपांडे १,००,०००/-
बायोवेद फार्मास्युटिकल्स ८०,०००/- विवेक पोंक्षे ६५,०००/- पद्मजा जोशी ४०,०००/-
प्रदीप चिकटे ३०,०००/- नंदा काळे ३०,०००/-

♦ **रु. २५,०००/- ते ११,०००/- मधील देणगीदार**

बिपीन अद्वंत, नितीन इंगळे, उषःकाल प्रतिष्ठान, देवधर क्लासेस, राजीव हजरनवीस, अनुराधा जोशी

♦ **रु. १०,०००/- देणगीदार**

मिलिंद मोडक, राजीव परांजपे, धनंजय गोरे, अंजली आंबेडकर, परेश बापट, अश्विनी गणु, विलास जावडेकर, अनुजा बर्वे, अश्विनी कीर्तने.

♦ **रु. ५,०००/- देणगीदार**

योगेश भावे, दिगंबर परुळेकर, पंचूर हॉटेल, विजय थत्ते, अनघा जोशी, नीता गडकरी, अमृता कुलकर्णी, प्रमोद जाधव, कुलकर्णी टायर अँड ऑटो सर्विसेस, प्रिमांश शाह, अलका पटवर्धन, रविशंकर विद्या मंदिर, ईश्वरी बापट.

♦ **रु. ५०० ते ४००० या मध्ये ३४ देणगीदारांनी देणगी दिली. वरील सर्व धरुन एकूण ६९ हितचिंतकांचे आम्ही कृतज्ञ आहोत.**

# किशोरी विकास



**नियमित शालेय तासिका :** दर वर्षी प्रमाणे यंदाही शालेय तासिका ११ शाळांमध्ये नियमित घेण्यात आल्या. प्रत्येक शाळेसाठी १० सत्रे झाली. त्या संपर्कामुळे त्यांच्यासाठी शाळेत व शाळे शिवायही खालील गोष्टी करता आल्या, त्या अशा

**कथाकथन स्पर्धा :** दर वर्षी आपण किशोरी विकास उपक्रमात कथाकथन स्पर्धा घेतो. यंदा ही स्पर्धा प्रत्येक शाळेत स्वतंत्र घ्यायची असे ठरवले. साने गुरुजी कथामालेच्या मार्गदर्शिका सगळ्या शाळेत मार्गदर्शनासाठी जाऊन आल्या. त्यानंतर स्पर्धा जाहीर केली. कुरुंगवडी, सोंडे माथना, मंजाई आसनी, कुसगाव, कल्याण, माळेगाव, दापोडे, वेल्हे अशा शाळेत कथाकथन स्पर्धा झाली. त्यात १६० मुले-मुली सहभागी झाले होते. प्रत्येक शाळेत ३ क्रमांक काढले. त्या ३ जणांची पुन्हा अंतिम फेरीची स्पर्धा घेतली व त्यात एकूण ३ क्रमांक काढले. यंदा प्रत्येक शाळेत स्पर्धा घेतल्यामुळे जास्त जणांनी सहभाग घेतला हे विशेष!



**नेतृत्वाचे निवासी शिबिर :** किशोरींचे दि. २३-२५ डिसेंबर कालावधीत आंबवणे येथील जीवनज्योती केंद्रात नेतृत्वाचे निवासी शिबिर घेतले. यामध्ये ७ शाळेतल्या १२० किशोरी व २२ युवती सहभागी झाल्या होत्या. किशोरींना अभिव्यक्ती कशी करायची याचे सत्र सुनिलाताई गोंधळेकर यांनी घेतले व मग अश्विनीताई व सहकाऱ्यांनी गावात मेळावा कसा घ्यायचा ? हे सांगणारे सत्र घेतले. या नंतर एकत्रित नियोजन करून गटागटाला दुसऱ्या दिवशी जवळच्या पण अनोळखी गावात जाउन मुलेमुली जमा करून मेळावे घेण्यास सांगितले. हे मेळावे यशस्वी झाले. किशोरींनी गावोगावी घेतलेल्या या २ तासाच्या मेळाव्यात ८ गावात मिळून १६२ स्थानिक मुली जमा करून मेळावे घेतले.

शिबिराच्या शेवटच्या दिवशी सर्व मुली व ताया राजगड चढल्या. खरोखर नेतृत्वासाठी लागणारे धाडस त्यांनी अनुभवातून शिकले. ते गड चढताना वेगळे लागते नि अनोळखी गावातल्या मुलांसमोर गोष्ट सांगायला उभे रहायला वेगळे लागते हेही त्यांना समजले! नियोजनपूर्वक गोष्टी करायची संधी मिळाली की अनुभवातून बरेच शिकता येते हेही त्या शिबिरात शिकल्या. प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव व विभाग प्रमुख सुवर्णाताई यांनी शिबिरास भेट दिली.



**विद्याव्रत :** या वर्षी किशोरी विकासा अंतर्गत कुसगाव व कल्याण या गावांना अनुक्रमे ४४, ४२ विद्यार्थ्यांचे विद्याव्रत झाले. त्याला मृदुलाताई व अंजलीताई भिडे आचार्य म्हणून उपस्थित होत्या. कल्याण येथे ६ वर्षांपूर्वी विद्याव्रत घेतलेले २ जण उपस्थित होते त्यांनी मनोगत व्यक्त केले हे विशेष!

**गाववार विज्ञान मेळावे:** एप्रिल-मे महिन्यात युवतींच्या गटाचे प्रशिक्षक प्रशिक्षण घेऊन त्यांना विज्ञान प्रयोग शिकवले आणि त्यांनी ठरवले की हे शिकलेले प्रयोग गावातल्या २००० पेक्षा जास्त किशोरवयीन गटांपर्यंत पोचवायचे! या गटाने खरोखरच प्रयत्नपूर्वक ११६ गावातल्या २५०८ किशोर-किशोरींचा सहभाग असणारे मेळावे घेऊन नवा विक्रम केला. यामुळे गावातल्या मुला-मुलींना गावातच मिळणाऱ्या साधनातून वैज्ञानिक प्रयोग करायची संधी तर मिळालीच पण हे मेळावे गावोगावी जाऊन घेणाऱ्या २४ युवतींच्या गटाला उद्दिष्ट ठरवून उद्दिष्टपूर्तीसाठी गटाने कसे झपाटून काम करायचे हे ही शिकता आले, हे वेगळे सांगायला नकोच. (याचा स्वतंत्र लेख शेवटी दिला आहे)



**किशोरींसाठी चालू असणारे अन्य प्रकल्प:** प्रज्ञा मानस संशोधिके सोबत शिवापूर शाळे सोबत चालू असणारा सतेज प्रकल्प पोस्ट टेस्ट होऊन संपला तर सुमेधा प्रकल्पाचा समारोप २ ऑक्टोबरला जीवनज्योती केंद्रात झाला, तेव्हा हा प्रकल्प चालू असणाऱ्या शिवरे, वाजेघर, वेळे व गुहिणी गावातील मुली जीवनज्योती मध्ये आल्या होत्या व त्यांनी विविध कलांचे सादरीकरण केले. या प्रकल्पासाठी स्थानिक युवतींनी प्रशिक्षणानंतर प्रशिक्षक म्हणून काम केले. त्यात त्यांना संशोधन पद्धतीचे शिक्षण मिळाले.

## जास्वंद गिरीकन्या मुलींचे वसतिगृह

हे निवासाचे ४थे वर्ष! यंदा निवासात २३ मुली व ३ ताई अशा २६ जणी रहात होत्या. त्यापैकी १६ जणी यंदा नव्याने दाखल झाल्या आहेत. यंदा सहनिवासात आलेल्या अनेकींच्या आईने तर कधी शाळा बघितलेली सुद्धा नाही, वडिलांचेही शिक्षण जेमतेम अशा ८ जणी दुर्गम वस्त्यांमधून

आलेल्या आहेत! यंदा आय टी आय मध्ये शिकणाऱ्या २ जणींना प्रवेश दिला. एका एकल महिलेच्या मुलीला सुध्दा प्रवेश दिला. गरजू मुलींपर्यंत आपण पोचलो याचे समाधान या वर्षीही आहेच. दरवर्षी प्रमाणे यंदाही सहनिवासात राहिल्याने मुलींना शिस्तीची सवय लागली. अभ्यासाबरोबरच यंदाही नियोजनपूर्वक भरपूर गोष्टी केल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास लक्षणीय वाढला असे लक्षात आले. या वर्षी सहनिवासात ५ वी ते ११वीच्या मुली किरकोळ शुल्क देऊन राहिल्या तर १ युवती स्वतः कमाई करून पूर्ण खर्च देऊन सहनिवासात राहिली.



नेहमी प्रमाणे यंदाचा निकालही समाधानकारक लागला. प्राथमिक शाळेतल्या सर्व जणी अ१, अ२ श्रेणी मिळवून वरच्या वर्गात गेल्या. त्यातल्या अनेक जणींना वैयक्तिक मार्गदर्शन मिळाले म्हणूनच केवळ त्या अभ्यासात समाधानकारक श्रेणी मिळवू शकल्या. ज्या पार्श्वभूमीतून या मुली येतात त्यांच्याकडून अभ्यासात चांगले चमकण्यासाठी काही वर्षांचे सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे असे लक्षात आले. अभ्यासात मुलीची प्रगती समाधान कारक होती. माजगावची सविता ७४.७% मिळवून कॉलेजमध्ये तिसरी आली तर एफ्. वाय. (कॉमर्स)ला असणारी मंगल काम करत करत स्वतःच्या पायावर उभी राहून शिकली तरी कॉलेजमध्ये ३री आली हे विशेष!

**'शनिवारची शाळा'** : वर्षभरात व्यक्तिमत्त्व विकासासाठी 'शनिवारची शाळा' हा अभ्यासपूरक उपक्रम यंदाही अधिक जोमाने राबवला. यासाठी वर्षभरात ३० सत्रे घेतली त्यात २६ माजी विद्यार्थिनींचा सहभाग होता.

**याशिवाय:** अभ्यासेतर गोष्टी करताना लहान गट व मोठा गट असे २ विभाग केले. त्यानुसार काही वेगवेगळ्या गोष्टी व कौशल्ये त्यांना येतील असे पाहिले. अगदी त्यांची सहल काढतानाही त्यांच्या भाव विश्वाचा विचार करून काही गोष्टींचे अनुभव मिळतील असे पाहिले.

**छोटा गट :–** बौद्धिक खेळ , उत्स्फूर्त भाषण, विषय देऊन ५ मिनिटं ५ वाक्ये बोलणे, आकड्यांचा खेळ, अवयवांच्या म्हणी, इंग्रजी गोष्टीचे पुस्तक वाचन दोन्ही गटांना 'या पुढे यशाकडे', पद्य, इंग्लिश वाचन, अनुवाद, नाटुकली सादर करणे, आरोग्य, बालमित्र वाचन, कविता व बौद्धिक खेळ, 'मी कोण होणार' यावर चर्चा, २ ऑक्टोबर चित्रकला स्पर्धा, बॉल बनविणे, पूर्णा चित्रपट दाखविला, इंग्लिश स्पेलिंग, ७वी बीजगणित,५, ६वी अपूर्णांक बेरीज, वजाबाकी, नवीन इंग्लिश कृती शब्द शिकविले, अर्थ सांगितले, वाक्यात उपयोग करून घेतला, गोष्टीरूप आप्पा या पुस्तकातील गोष्टी वाचल्या. या शिवाय पुण्याला येऊनही कात्रज प्राणी संग्रहालय पाहिले.

**मोठा गट :–** वाणिज्य शाखेची माहिती, बँकेच्या विविध खात्यांची माहिती, बँकेच्या व्यवहारांची ओळख करून घेतली, बौद्धिक खेळ, नावाच्या अक्षरावरून विशेषण सांगणे असे खेळ खेळले व गीते शिकविली, अर्थ समजून इंग्रजी वाचन घेतले. शनिवार शाळेत त्यांना काय विषय शिकायला आवडतील यावर चर्चा केली, किल्ल्यांची माहिती, स्मरण शक्ती व इतर बौद्धिक खेळ. इंग्रजी पाठ वाचन, इयत्ता ८वीसाठी पाठयपुस्तक चळवळ, १०वी साठी कागदाच्या भौमितिक रचना, भगिनी निवेदिता चरित्रातील भाग वाचन अशा काही गोष्टी घेतल्या. या शिवाय मोठ्या गटाला एल ई डी दिवे बनवणारी कंपनी पहाणे व कोल्ड स्टोरेज बघणे असे औद्योगिक क्षेत्र बघायची संधी दिली.



**गावासाठी:** सुट्टी लागल्यावर बहुतेक जणी घरी गेल्या तेव्हा अनेकींनी गावातल्या मुलांसाठी सांगितल्या प्रमाणे २–३ तासाचे मेळावे घेतले. त्यामुळे मुली निवासात येऊन अभ्यासाबरोबरच अजूनही बरंच काही महत्त्वाचे शिकतात हे आता गावापर्यंत पोचायला लागले. या मुलींना बघून गावातली काही मंडळी आपल्या मुलीलाही मोठी झाल्यावर येथे ठेवावे असे वाटून भेट देऊन गेली.

**गृहभेटीसाठी:** निवास प्रमुखांनी गावोगावी जाऊन नव्याने आलेल्या प्रत्येक मुलीच्या घरी भेट दिली. या गृहभेटी दिल्यामुळे त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती समजायला खूप उपयोग झाला असेही लक्षात आले. यंदा या भेटीमुळे मुलींच्या गावात त्यांच्या आई पालिकांना भेटल्यामुळे त्यांना आपल्याबद्दल आलेल्या विश्वासामुळे इतरही काही कार्यक्रम घेता आले जसे डोळे तपासणी शिबिर, ज्येष्ठ महिलांची योनी मुखाच्या कॅन्सरची तपासणी. ही यंदाची विशेष भर!

वेल्ह्याच्या जास्वंद गिरीकन्या निवासाने यंदाही वेल्ह्याच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत बरची पथक उतरवले होते. यंदा नव्याने ११ जणी बरच्या शिकल्या. एकूण पथक १९ किशोरींचे होते सोबत ८ युवतींचा वाद्यवृंद होता.

**किशोर विकास उपक्रमाचे पहिले वर्ष :** अनेक उपक्रम हे किशोरींसाठी होतात त्यामुळे त्या वर्गातील मुले नाराज होतात म्हणून यंदा एक नवीन पाऊल उचलले. दि. २०–२१ जानेवारीला शिवापूरच्या राम–सीता पुराणिक तंत्र निकेतनमध्ये किशोर विकासाचे पहिले निवासी शिबिर घेतले. कल्याणचा हृषीकेशदादा शिबिर प्रमुख होता. किशोरांसाठी त्याने तासिका घेतल्या होत्या. त्या संपर्कातून हे शिबिर झाले. या शिबिरात तागडे सर, कल्याण शाळेतील अध्यापक शिंदे सर, अश्विनीताई यांनी २० तारखेला ३ सत्रे घेतली तर २१ तारखेला शिबिराचा सगळा गट पुरंदर किल्ल्यावर जाऊन आला.

## कातकरी वस्ती

आपण एप्रिल २०१७ पासून वेल्ह्यातल्या मालवली येथल्या २ कातकरी वस्तीवर नव्याने काम सुरू केले. वर्षभरात वस्तीवर जवळ जवळ २५ सत्रे घेतली. विकासाच्या टप्प्यातला सगळ्यात शेवटचा घटक म्हणून वेल्ह्यातील युवती गटाने हे काम आव्हान म्हणून स्वीकारले. 'आपल्याला शाळेत जायची संधी मिळत असली तरी या वस्तीवरची सगळी मुले शाळेत जात नाहीत. सर बोलवायला घरी येतात तरी मुले शाळेत जात नाहीत' असा धक्का युवतींना पहिल्या काही भेटीतच बसला. मग यांच्यासाठी दला सारखे खेळाचे उपक्रम सुरु केले. त्यात नियमित खेळ, गाणी शिकणे या



बरोबरीने आरोग्याच्या सवयी संबंधी सत्रे झाली. अगदी रोज वेणी घालायची, रोज आंघोळ करायची इथपासून सुरुवात होती. पुन्हा पुन्हा शाळेत जायला हवे असे सगळ्यांना सांगावे लागत होते. अशा प्रकारे आपल्या संपर्कात आल्यामुळे वस्तीवरची २ मुले शाळेत जायला लागली आहेत. तर एकीने जीवनज्योतीमध्ये जाऊन शिवण वर्ग पूर्ण केला.

एकीने पुढाकाराने बचत गट सुरू केला नि वस्तीवरच्या सगळ्यांना कमी व्याजाने कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा केला. आपल्या नियमित केलेल्या एखाद्या छोट्याशा कृतीने सुद्धा एखाद्याच्या आयुष्यात किती मोठा बद्दल घडू शकतो हे युवतींना जवळून बघायला मिळाले.

## युवती विकास

**नियमित तासिका :**

**इयत्ता ११ वी :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वेल्हे, दापोडे व विंझर अशा ३ महाविद्यालयांमध्ये व्यक्तिमत्त्व विकसनाच्या महिन्याला २ या प्रमाणे २६ तासिका झाल्या. या तासिकेला तीनही महाविद्यालयांमधील मिळून ४० गावातून १०९ युवती होत्या. या तासिकांमध्ये आशयाच्या अभ्यास कौशल्य, प्रकल्प परिचय, नियोजन कौशल्य, भावना परिचय, गटकार्य, कल चाचणी तर कौशल्याची ओरिगामी, पेपर क्विलिंग, स्ट्रॉ पासून ब्रेसलेट अशी सत्रे झाली.

**इयत्ता १२वी :** ११वी मधून १२वीत गेलेल्या युवतींशी संपर्क व्हावा म्हणून नव्यानेच १२ वीच्या वर्गांवर ध्येय निश्चितीची ३ सत्रे झाली. या सत्राला तीनही महाविद्यालयांमधील मिळून २८ गावातून ११४ युवती तर जवळपास १०० युवक होते.



**कौशल्य प्रशिक्षण वर्ग :** गाव पातळीवर घेतलेल्या या प्रशिक्षण वर्गामुळे धानेप, केळद, वेल्हे, दापोडे, विंझर, अस्कवडी, मार्गासनी, शिवापूर, भाटघर, शिवरे अशा एकूण १० ठिकाणी २५ गावातील युवतींना कौशल्य शिकण्याची संधी मिळाली. १० गावांमध्ये मिळून १६ प्रशिक्षण वर्ग झाले. या वर्गामध्ये २१३ युवती सहभागी झाल्या.

**अभ्यास सहल :** यावर्षी काढलेल्या अभ्यास सहलीमुळे सहभागींना एखादी कंपनी काय व कसे काम करून उत्पादन करते हे नव्यानेच शिकायला मिळाले. या अभ्यास सहलीला २० गावातून ६२ युवती आल्या होत्या. भेट दिलेल्या कंपनी – १. ए. ॲण्ड ए. ग्लोबल रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड २. पेंग्विन कोल्ड स्टोअरेज. तसेच येताना गटाने प्रति बालाजीचे दर्शनही घेतले.

**युवती मेळावे :** वेल्हे, आंबवणे या २ ठिकाणी २३ गावातून ८० युवतींसाठी मेळावे झाले. हे मेळावे मुलींनी स्वतःच्या पायावर उभे राहावे म्हणून घेतले. या मेळाव्यांमुळे गावा–गावातून कौशल्य प्रशिक्षण वर्गांची मागणी आली आणि त्याप्रमाणे वर्गही झाले. या मेळाव्याचे मुख्य विषय केक प्रशिक्षण व क्विलिंग फ्रेम तसेच गुण–दोषांचा खेळ, गटचर्चा, मैदानी खेळ हे होते.

**गणेशोत्सव सहभाग :** वेल्हे सहनिवासातील किशोरींबरोबर १० युवतींचे ढोल–बर्चीचे पथक गणेशोत्सवात सहभागी झाले. या पथकात काही कॉलेज तासिकांमधील तर काही किशोरी–युवतींसाठी काम करणाऱ्या युवती सहभागी झाल्या.

**संधी :** घडणीच्या काळात कुठली संधी मिळते याला खूप महत्त्व असते यंदा आपण नियमित संपर्कात असणाऱ्या अनेक युवतींना विविध प्रकारच्या संधी उपलब्ध करून दिल्या. या अनुभवाने त्यांच्या आयुष्याला दिशा मिळण्या इतक्या या संधी महत्त्वाच्या होत्या. त्यामुळे युवती गट अधिक जबाबदारीने काम करायला शिकला.

**१. कला–कौशल्य शिकवण्याची संधी :**

- वेगवेगळ्या गावांमध्ये १४१ युवतींना ओरिगामी मासा व समई, क्विलिंगचे कानातले, मण्यांचे फुल शिकवण्याची संधी ८ युवतींनी घेतली.
- जीवनज्योती करंजावणे येथे ४५ युवतींना वारली चित्रकला व १४ युवतींनी ढोल शिकवण्याची संधी घेतली.

**२, तासिका घेण्याची संधी :**

- किशोरी विकास उपक्रमामध्ये ९ युवतींनी प्रशिक्षक म्हणून संधी घेतली.
- युवती विकास उपक्रमामध्ये ६ युवतींनी ९ कौशल्य प्रशिक्षण देण्याची सत्रे घेतली.

| क्र. | प्रशिक्षण | एकूण वर्ग | कालावधी | गावे | सहभागी युवती |
|---|---|---|---|---|---|
| १. | ओरिगामी मासा | ३ | १ दिवस | ३ | ३० |
| २. | ओरिगामी समई | २ | २ दिवस | २ | ३० |
| ३. | मण्यांचे फुल | ४ | १ दिवस | ४ | ६९ |
| ४. | क्विलिंग कानातले | १ | १ दिवस | १ | १२ |
| ५. | संस्कारभारती रांगोळी | १ | ५ दिवस | ९ | २७ |
| ६. | शिवण वर्ग | ४ | २ महिने | ५ | ३३ |
| ७. | ब्युटी पार्लर वर्ग | १ | १ महिना | १ | १२ |
| | | १६ | एकूण | | २१३ |





कातकरी समाज किशोर–किशोरी विकास उपक्रमात मुलांनी शिक्षणाच्या प्रवाहात यावे याकरिता ३ युवतींनी मालवलीच्या २ वस्त्यांवर ६५ सत्रे घेतली.



३. **शिबिर संयोजन व सहभागाची संधी :**

सुमेधा, किशोरी शिबिरात गट प्रमुख ताई म्हणून १५ गावातून १६ युवतींनी संधी घेतली. केळदमध्ये पुण्यातील नेतृत्व संवर्धन विभागाकडून झालेल्या नेतृत्व शिबिरात ४ युवतींनी पहिल्यांदाच सहभागी होण्याची संधी घेतली.

**युवती संघटन :** संपर्क वाढीसाठी फेब्रुवारीपासून युवती संघटनेची नव्याने बैठक सुरू केली. युवती संघटनेच्या ४ बैठका झाल्या. या बैठकीला एकूण २० युवती सहभागी झाल्या. शाळाबाह्य तसेच कॉलेज मधील युवतींचा संपर्क कोणत्या ना कोणत्या कारणाने (प्रशिक्षण,मेळावे, शिबिरे, सहली) होत आहे, परंतु दरवर्षी हा गट बदलत राहतो. या गटाचा तसेच दरवर्षी येणाऱ्या नवीन गटाचा एकमेकांशी तसेच आपलाही संपर्क सातत्याने राहावा यासाठी युवती संघटन सुरू झाले. या गटातील युवतींसाठी वेगवेगळ्या सत्रांचे नियोजन करणे तसेच छोटे–छोटे प्रकल्प आखून त्यावर या गटाने काम करणे सुरू आहे.

**महिला दिनानिमित्त आय. टी. कंपनी भेट :** आयटी पार्क मधील कॅडेन्स कंपनीला ११ गावातून १७ युवतींनी भेट दिली. भव्य अत्याधुनिक कंपनी पाहण्याचा मुलींचा पहिलाच अनुभव होता. कंपनीने ३ तासाच्या कार्यक्रमाचे छान नियोजन केले होते. कंपनीतील अधिकाऱ्यांनी मुलींच्या खालील गोष्टी घेतल्या. मोत्यांचे कानातले बनवायला शिकवले, गटकार्य, पथनाट्य सादरीकरण तसेच तिथेच रोटरी क्लबच्या सहकार्याने सहनिवासाला Projector भेट दिला.



**१२वी नंतरचे शिक्षण :** डिसेंबर २०१७ मध्ये युवती शिबिर झाले. या शिबिरात कर्वे शिक्षण संस्थेमध्ये चालणाऱ्या निरनिराळ्या कोर्सेसची माहिती युवतींना दिली. यामुळे शिबिरात आलेल्यांपैकी ३ युवतींची कर्वे शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण मिळण्याची सोय करण्यात आली. पुढील शिक्षणासाठी लागणारा खर्च जास्त होता, परंतु मुलींचे पुढील शिक्षण झालेच पाहिजे असे ठरवून ३ मुलींनी प्रबोधिनीचे काम करून शिक्षण, राहणे, जेवण यासाठीचा पैसा उभा करायचा आणि शिक्षण घ्यायचे असे ठरविले. त्यातील दोघींना पुढील शिक्षणासाठी स्कॉलरशिप मिळेल आणि राहण्याची, जेवणाची सोय महर्षी कर्वे इनस्टिट्यूटमध्ये कमवा व शिका योजनेतून होईल असे पाहिले.

**जीवनज्योती महिला सक्षमीकरण केंद्र:** आंबवणे येथे स्टरलाईट टेक फौंडेशन च्या आर्थिक साहाय्याने युवती व महिलांसाठी तंत्र शिक्षण प्रशिक्षण देणारे वर्ग घेतले जातात. ज्यामध्ये संगणकाचे २ वर्ग (डेटाएन्ट्री ऑपरेटर व एम एस ऑफिस) २ शिवण वर्ग (फॅशन डिझाईनिंग व बेसिक टेलरिंग), बेसिक पार्लर असे ६ महिन्याचे शासन मान्य अभ्यासक्रम व वर्ष भराचा शासन मान्य सर्टिफिकेट कोर्स इन नर्सिंग केअर असे वर्ग घेतले जातात. प्रत्येक वर्गात २५ जणींना प्रवेश दिला जातो. गेल्या वर्षात अशा प्रत्येक वर्गाच्या २ तुकड्यांतून साधारण २८० पेक्षा जास्त मुली उत्तीर्ण झाल्या. त्या जो काळ केंद्रात येतात त्या वेळी त्यांची गावातून जाण्या–येण्याची व्यवस्था, दुपारच्या सकस जेवणाची व्यवस्था स्टरलाईटच्या आर्थिक सहकार्यामुळे केली जाते. या शिवाय त्यांचा आत्मविश्वास वाढावा म्हणून विविध व्यक्ती विकासाच्या १२ सत्रांची रचना यावेळी केली होती. त्यांच्यासाठी आपण दलही चालवले. यंदा १० मार्चला महिला दिना निमित्त तेथील ४३ युवती–महिलांनी विद्याव्रत घेतले. ज्ञान प्रबोधिनीचे मा. संचालक आचार्य म्हणून या कार्यक्रमास उपस्थित होते. अश्विनीताई, बागेश्रीताई, सुवर्णाताई यांनी पूर्वतयारी व्याख्याने दिली.

**पुन्हा शिक्षण ! :** यशवंतराव मुक्त विद्यापीठाच्या १२वी समकक्ष परीक्षेला बसण्यासाठी १२ जणींनी अर्ज भरले. आज पर्यंत असे फॉर्म भरणाऱ्या १५० हून अधिक युवती झाल्या, त्यापैकी बहुतेक जणी उत्तीर्ण झाल्या आहेत, त्यातल्या ७ जणींनी यंदा प्रथम वर्षाला प्रवेश घेतला आहे. आता एप्रिल मध्ये त्यांची प्रथम वर्ष कला शाखेची परीक्षा होईल. या प्रक्रियेतून आपल्या प्रयत्नामुळे महिला पुन्हा एकदा शिकायला लागल्या!

## बालवाडी

वेल्ह्याच्या दुर्गम भागात बालवाडी चालवण्याच्या कामाचे हे पाचवे वर्ष! या वर्षी ८ बालवाडीमध्ये ७५ मुले होती. बालवाडीच्या पालक बैठकी नियमित झाल्या. आता पालकांना आपल्या बालवाडीतील हसत खेळ शिक्षण ही पध्दती समजली आहे. त्यामुळे बालवाडीतील विविध उपक्रम किंवा पाठ पाहण्यास पालक उत्सुकतेपोटी वर्गात येतात. पालक सभेच्या वेळी पाठाची मांडणी जाणीवपूर्वक केली होती. उदा– पीठ चाळणे, भाजी निवडणे, इ.

या वर्षी बालवाडीतील मुलांसाठी वेगळा अनुभव म्हणून चित्र रंगभरण स्पर्धा योजली होती. एकाच चित्रांच्या झेरॉक्स काढून प्रत्येक बालवाडीतील मुलांना हे चित्र रंगवण्यास दिले होते. या मध्ये रायदंडवाडी, गेळगाणे या गावातील मुलांनी योग्य रंगसंगती साधून चित्रं रंगवली होती.



**बालमेळावा :** आपण बालवाडीतील मुलांच्या पायी सहली हा उपक्रम नियमित घेतो. परंतु लांबच्या सहली असे कधी झाले नव्हते. या वर्षी बाल मेळाव्याच्या निमित्ताने सर्व मुलांचा गाडीचा प्रवास घडला. ही मुले गावागावातून वेल्हे सहनिवास येथे एकत्र आली. या मेळाव्यात मुलांनी गाणी गोष्टी यांचे सादरीकरण केले, खेळ, चित्र काढणे, रंगवणे असे विविध उपक्रम झाले. या मेळाव्यात सहनिवासातील किशोरींनी उत्साहाने मेळाव्याच्या तयारीतही सहभाग घेतला.

टेल्को मधील निवृत्त सदस्यांच्या गटाने ( श्री. राजीव नातू यांचे सहकारी) देवपाल, कुसगाव बालवाडीला भेट दिली. अशा भेटीतून बालवाडी ताईचा आत्मविश्वास वाढतो. नवीन लोकांसमोर आपले काम मांडण्याची संधी मिळते.



**शिक्षकांसाठी विविध उपक्रम :** आपल्या कामाचा महत्त्वाचा पाया म्हणजे बचतगट यांच्या माध्यमातूनच आपण विविध विषयांवर काम करतो त्यामुळे ज्यागावात बालवाडी चालते तेथे बचतगट चालू होतील असा आग्रह धरला जातो. त्यामुळे आता प्रत्येक गावात (बालवाडीच्या) बचतगट झाले आणि या सर्व ताई गटाच्या मासिक बैठकीत हिशोबासाठी नियमित येतात त्यामुळे आणखी विविध उपक्रमही त्यांना समजतात.

✻ परिसंवादातील सहभाग : यावर्षी जीवनज्योती येथे सादर झालेल्या परिसंवादाच्या रंगीत तालमीमध्ये या बालवाडी ताईंनी त्यांच्या कामाचे मूल्यमापन केले.

✻ १२ जानेवारी रोजी जीवनज्योती, करंजावणे येथे झालेल्या कथाकथन स्पर्धेत या बालवाडी ताईंनी विवध गोष्टी सांगितल्या त्यामुळे सभाधीटपणाचा अनुभव त्यांनी घेतला.

✻ बचतगटाच्या विक्री उपक्रमातही त्यांनी वरई, तांदूळ इ. धान्याची विक्री केली.

बालवाडीताईंनी सहनिवासात त्यांच्या मुलींनी ही प्रवेश घेवून गावात एकवेगळा ठसा उमटवला. एकूणच गावपातळीवर चालू असलेल्या बालवाडीच्या माध्यमातून जसे बालवाडीचे शिक्षण होते तसेच ताईंचे सुध्दा अनुभव शिक्षण होते असे वाटते.

**गुणवत्ता विकासाचे मासिक प्रशिक्षण** : याशिवाय आपण शासकीय अंगणवाडी ताईंचे डिसेंबर २०१७ पासून गुणवत्ता विकासाचे मासिक प्रशिक्षण सुरू केले आहे. अशी ४ प्रशिक्षणे या वर्षी झाली. त्यासाठी पुण्यातून विविध विषयात तज्ज्ञ प्रशिक्षक म्हणून वेल्ह्याला आले होते.

## हिरकणी

**नियमित सत्र :** हिरकणी प्रकल्प म्हणजे ०-६ वयोगटातल्या मुलांच्या आईचे पालकत्वाचे प्रशिक्षण! सत्रे घेतली. पुण्यातून मार्गदर्शक फक्त आरोग्य सत्रासाठीच गेले होते. या गटाने हराळीला जाऊनही या प्रकल्पाची माहिती देऊन सत्रे घेतली. या शिवाय आजी-माजी हिरकणींचा मेळावा घेतला. त्यात १० गावांतील ४२ जणी स्वतः प्रवास खर्च करून आल्या होत्या. या मेळाव्यात अनुभव कथन, 'तारे जमिनपर' हा सिनेमा पहाणे असे होते.





**प्रशिक्षक प्रशिक्षण सत्र:** स्थानिक माजी हिरकणी चालू कामाची जबाबदारी घ्यायला तयार व्हाव्यात म्हणून त्यांची मासिक प्रशिक्षण बैठक आंबवणे येथे घेतली जाते. या बैठकीत निवेदन, नियोजन तर होतेच. पण कामात येणाऱ्या अडचणींवर ही चर्चा होते. सत्रानुसार प्रशिक्षण ही होते. या बैठकीचा भाग म्हणून अशाच प्रकारचे काम जेथे चालते अशा पुण्यातल्या गरवारे बालभवन येथे उमाताई बापट यांच्या 'आईचे शेपूट' या प्रकल्पाला भेट दिली. गावात काहीही शुल्क न घेता चालवलेल्या या उपक्रमाला शहरात किती शुल्क देऊन पालक येतात असे जागृत पालक त्यांनी पाहिले. त्यासाठी किती तयारी करावी लागते हेही जवळून बघितले. त्याच दिवशी नंतर प्रबोधिनीच्या मुख्य वास्तूत गट आला व त्यांनी मा. संचालकांची भेट घेतली. गटाला मा. कार्यवाह यांनी मार्गदर्शन केले.

**उपक्रम विस्तार :** डिसेंबर महिन्यात ज्ञान प्रबोधिनी हराळी (उस्मानाबाद) येथे हिरकणी विस्तार मेळावे झाले. ७ मार्गदर्शकांनी हराळी, तोरंबा, धानोरी या गावातून हिरकणी मेळावे घेतले. साधारण १०० स्थानिक महिलांचा सहभाग होता. या निमित्ताने गट ६-७ तास प्रवास करून गेला, मेळाव्याच्या आशयाची योजना त्यांनीच केली यामुळे अशी संधी घेतलेल्या हिरकणींचा आत्मविश्वास अपेक्षे प्रमाणे वाढला व आपले काम नवीन ठिकाणी कसे मांडायचे हेही त्या शिकल्या! या निमित्ताने घरा बाहेर पडल्यामुळे नळदुर्ग किल्ला, श्री क्षेत्र अक्कलकोट याचे ही दर्शन केले. या प्रशिक्षणामुळे ४ जणींनी प्रथमच रेल्वे प्रवासाचा अनुभवही घेतला.

## नवचैतन्य गट (दल)

२०१५ पासून आपण गाव पातळीवर नवचैतन्य गट म्हणजेच दल सुरू केले. सुरुवातीला २०१५ साली फक्त ४ गावात ७०/८० संख्येचेच गट झाले. पण यंदा मात्र २०१७-१८ साली २०० च्या आसपास मुलांचा सहभाग असणारे १८ गट काम करत आहेत. हे गट १३ गावात विखुरलेले आहेत. ८ एप्रिल २०१७ रोजी गावपातळी दल प्रशिक्षण झाले आणि सुट्टीतील नियमित दले सुरू झाली. बहुतेक ठिकाणी त्याच गावातली धडपडी हिरकणी त्याची प्रमुख म्हणून काम करते. ८ ते १२ या वयोगटातील मुलांसाठी सुट्टीत रोज संध्याकाळी ४ ते ५.३० तर एरवी साप्ताहिक गुरु/शुक्र ४.३० ते ५.३० या वेळात साधारण १५ ते २० मुला-मुलींचा गट मैदानावर खेळताना दिसू लागला आहे. दलात येणाऱ्या मुला-मुलींनी मैदानावर एकत्र खेळावे त्याचप्रमाणे त्यांनी वाचन ही करावे. ही कल्पना सर्वांच्या मागणी नुसार १० गावातील १०० मुलांना दलावरती दर पंधरा दिवसातून एक पुस्तक वाचनासाठी दिले गेले. त्यांचा



वाचनाचा कल वाढावा हेच मुख्य उद्दिष्ट होते. या उपक्रमाचा पाठपुरवठा करण्याचे काम ही एक स्वतंत्र व्यक्ती करत आहे. पंधरा दिवसातून एकदा प्रत्येक गावात भेटी देऊन मुलांशी वाचन केलेल्या पुस्तकांविषयी गप्पा मारून त्यांचा पाठपुरावाही करत आहोत.



मे मध्ये सुट्टी संपताना जीवनज्योती केंद्रावर या मुलांचा आनंद मेळावा घेतला, त्यात १७५ मुलांचा सहभाग होता. या मेळाव्याला ज्योतीताई कानिटकर प्रमुख पाहुण्या म्हणून आल्या होत्या. बाल दिनाला वेगवेगळ्या १० गावातल्या दलावर जाऊन त्यांचे मेळावे घेतले. त्यात कागदी कौशल्य, खेळ, तसेच मुलांनी जमा केलेल्या वर्गणीतून खाऊ (पालकांनी पैसे दिले) असे मेळाव्याचे स्वरुप होते.

दापोडे गावातील मुलामुलींचा मेळावा वेगळ्याच स्वरूपाचा झाला. त्यांनी वेल्हे येथील गिरीकन्या सहनिवासाला भेट दिली व तेथेच त्यांचा बालमेळावा ही प्रतिभा स्वामी आणि युवती गटाने घेतला. असे विविध उपक्रम व नियमित खेळ घेऊन नवचैतन्य दलाचा गट उत्साहाने काम करीत आहे. पालकांनाही हा उपक्रम योग्य वाटत असून ते मुलांना प्रोत्साहन देतात असे लक्षात आले.

काही प्राथमिक शाळेत मुख्याध्यापकांच्या परवानगीने शाळेच्या वेळात शाळेच्या मैदानावर दल चालते. महत्त्वाचे म्हणजे आपण प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांना परवानगीपत्र देऊन शाळेच्या वेळात (४.३० ते ५.३०) शाळेच्या मैदानावर दल चालवतो. त्यामुळे शिक्षकांचेही लक्ष असते. त्यांना हा उपक्रम योग्य वाटला. एखादा दिवस दल नाही झाले तर शिक्षकही त्याचा पाठपुरावा करतात.

## महिला विकास

### बचत गट



- यावर्षी ६० गावात ३२२ बचत गट चालवले.
- ज्यात ५७७७ सभासद महिला होत्या.
- ज्यांनी दरमहा नव्याने १२ लाख ६७ हजार बचत केली

**✽ नवीन गावात गट :** हातवे, लव्ही, कोंढणपूर, कोंढवली, मालवली, आडवली, अस्कवाडी, कोदापूर, नाळवट, खाटपेवाडी, सणसवाडी या गावात नव्याने आपले बचतगट सुरू झाले.

गेली अनेक वर्ष वर्षाअखेर बचतगटाचे हिशोब सर्व गटांना गाव पातळीवर एकत्रित सांगितले जातात. अशा २६४ गटांचा हिशोबतक्ता खाली दिला आहे. आता तर अशा वार्षिक हिशोबांची गटाला सवयच झाली आहे. 'माझा हिशोबाशी काही संबंध नाही' असं पूर्वी म्हणणाऱ्या सभासद महिला, आता बचतगटाच्या हिशोबात रस घेऊ लागल्या आहेत. हिशोब करून करून त्यांची हिशोबातली समजही चांगली वाढली आहे. त्यामुळे काही जणी तर कोणी कर्ज काढलेले समजले तर उत्सुकता म्हणून भरलेल्या हप्त्यावरून व्याजाचा हिशोब करून 'कसे पडले?' हे बघतात. केवळ 'लाभार्थी' म्हणून उपक्रमात सहभागी न होता मालकी स्वीकारली की कसे बदल होतात ते आता दिसू लागले आहे.

**✽ 'डेली कलेक्शन'**: या वर्षी 'डेली कलेक्शन' अशा कल्पनेवर बचतगट सुरू केले. खेळते भांडवल लागणाऱ्या, रोज पैसे देऊ शकणाऱ्या दुकानदार, हात विक्री करणाऱ्या महिलांना छोटे भांडवल हवे असते की ज्याची रोज फेड होऊ शकते. असे लक्षात आले की छोटे कर्ज मिळवायला खर्चच फार होतो. 'डेली कलेक्शन' गटात रोज १०० रुपये जमा करायचे व एक रकमी २०,०००/- कर्ज घेऊन छोटासा प्रासंगिक उद्योग करायचा किंवा चालू उद्योगाला जोड द्यायची. चोख नियमित फेड झाली तर २२०-२२५ दिवसात सारे कर्ज फिटून जाते. असा प्रयोग गेल्या वर्षी ३ गटांत केला. वेल्हे, आंबवणे व शिवापूर या ठिकाणी ५ जणींचा एक असे ३ गट केले व त्या १५ जणींनी भांडवलाची व्यवस्थित फेड केली. कोणी भाजी टपरी टाकली तर कोणी छोटे दुकान, कोणी सिझनचे सामान दुकानात भरले तर कोणी गणपती साठी कर्ज वापरले, कोणी हॉटेल थोडे मोठे केले तर कोणी शिंप्याचे

**मार्च २०१८ रोजी बचत गटाचे हिशोब**

| | विभागाचे गाव | गट | सभासद | बचत | कर्ज | परतफेड | येणे बाकी | व्याज | दंड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिवापूर | २७ | ४९९ | ५८९५४०० | १४७२२७२२ | ६६४१२८१ | ८०८१४४१ | ३०४५९५४ | ९१७ |
| २ | श्रीरामनगर | १८ | ३१४ | ३८०२८०० | ८३३८२०० | ४१६४२८० | ४१७३९२० | ९३८५०३ | ३२७७ |
| ३ | गाउडदरा | १४ | २७० | ४५७२१०० | १०४८०९१४ | ३४५७५२० | ७०२३३९४ | २६८५४८० | १७०७६ |
| ४ | खोपी | १९ | २४७ | १६९५१०० | ४०७३२२८ | १२२४६१८ | २८४८६१० | ४५३५५५ | ६१० |
| ५ | नसरापूर | १२ | १८७ | ५२८१०० | ११००६०० | ४७६८१० | ६२३७९० | २०४५२७ | ६० |
| ६ | कासुर्डी | २६ | ४०१ | १३३१२६० | २८५५२४० | १२१७६१० | १५८८६३० | ४९५९९५ | ३०० |
| ७ | वेल्हे | २८ | ४५० | ९७९२५० | २००२९९३ | ९५९५९४ | १०४३३९९ | ३२०८७० | २५३० |
| ८ | नवदिशा | ५३ | ९०८ | २२५२४७० | ६६७६०२५ | ३५९१४५५ | २९९५६३४ | १०५००८७ | १२२८ |
| ९ | कुसगाव | १३ | २२३ | ६६०००० | २८२७१८९ | १५७८८७३ | १२४८३१६ | ४४६५२८ | ६३५ |
| १० | शिवरे | २४ | ३४७ | ३०५२९०० | ६५८२१५५ | २०४४६७० | ४५३७४८५ | १२८४०२१ | १८५१ |
| ११ | रांझे | १५ | ३३७ | १७३६३०० | ६१२०१४० | ३१९८२१२ | २९२१९२८ | ७५८७८६ | ० |
| १२ | राजगड | १५ | २३१ | ६३६४०० | १८०५०५७ | ८३५१४२ | ९६९९१५ | ३१००५८ | ४० |
| | | **२६४** | **४४१४** | **२७१४२०८०** | **६७५८४४६३** | **२९३९००६५** | **३८०५६४६२** | **११९९४३६४** | **२८५२४** |

दुकान टाकले अशा छोट्या उद्योगातून कमावती होणारीचे बळ या हक्काच्या पैशातून नक्कीच वाढले!

**❋ ॲड ऑन प्रकल्पाची सांगता :** गेल्या १० वर्षात आपण नाबार्डच्या आर्थिक सहकार्यामुळे ॲड ऑन प्रकल्पातून बचत गटांची बँक जोडणी करत होतो. पहिल्या वेळी ५० गट मग १०० गट आणि आता १५० गटांच्या कामाची पूर्तता आपण केली आहे. आता बँकेतून गटांना दुसरे, तिसरे क्वचित प्रसंगी चौथे लिंकेजही केले जाते. या वर्षीही कुठल्याही योजनेच्या आधाराशिवाय काही लाखांचे कर्ज गटांनी बँकेतून घेतले. आता बचत गटाच्या सभासद महिलांची बँकेतून कर्ज घेण्याची भीड चेपली आहे असे निश्चितच म्हणता येईल.

## स्वयंरोजगार



स्वतःच्या पायावर उभे रहाण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण, उद्योजकता प्रशिक्षण, विक्रीस साहाय्य अशा वेगवेगळ्या प्रकारे आपण ग्रामीण महिलांना मदत करतो. यंदा शिवण वर्ग, कापडी पिशव्या बनवणे, खाद्य पदार्थ उत्पादन, उन्हाळी वाळवणे, शेवई उत्पादन अशा वेगवेगळ्या ४० प्रशिक्षणांची गावोगावी योजना केली होती. त्यात १२१ जणी सहभागी झाल्या. १२ प्रशिक्षकांनी यात योगदान दिले. त्यातल्या ५ महिलांना नव्याने प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी दिली. उद्योजक महिलांचा उत्पादन विक्रीसाठी आपण १० लाखापेक्षा जास्त रकमेच्या उलाढालीला मदत केली. शिवापूर केंद्र, पुणे केंद्र इथे प्रदर्शने भरवून स्वयंरोजगाराला प्रोत्साहन दिले.



स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या अंत्रोली व कोंढावळे इथल्या २ महिलांना शेवई मशीन उद्योग सुरू करायला भांडवल पुरवून मदत केली तर एकीला फॉल पिको मशीन घेऊन दिले. त्याशिवाय शिवण वर्गात शिवण शिकलेल्या १० महिलांना शिवण काम मिळवून दिले तर एकीला फॉल पिको मशीन घेण्यास मदत केली.

अशा गावोगावी झालेल्या प्रशिक्षणाअंतर्गत ४० प्रशिक्षणातून ५ महिलांना नव्याने प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली.

**उलाढाल :** या उपक्रमातून तयार झालेल्या वस्तूंची भगिनी निवेदिता गटाने जबाबदारी घेतली व विक्रीची व्यवस्थाही केली. यंदा २लाख रुपयांची विक्री या गटाने केली. या शिवाय पावसाळी सहलीतून ५०,०००/–आपल्याद्वारे जमा झाले.

**प्रदर्शने :** शिवापूर ,शिवापूर केंद्र, पुणे येथिल प्रदर्शनात सहभाग घेतला. या शिवाय या वर्षी पासून पुण्यातील भगिनी निवेदिता गटाने स्वयंरोजगार वर्गाच्या उत्पादनाची पुण्यातील विक्रीची जबाबदारी घेतली.

**राम–सीता पुराणिक तंत्रनिकेतन :** शिवापूर येथील रामसीता पुराणिक तंत्रनिकेतनात नेहेमी प्रमाणे यंदाही विविध कौशय प्रशिक्षणे व स्वयंरोजगार प्रशिक्षणे घेण्यात आली. त्यात शिवण, मेहेंदी वर्ग, संस्कार भारती पद्धतीने रांगोळी काढणे, मणीकाम, राख्या बनवणे, वाख वस्तू तयार करणे अशी वेगवेगळी ११ प्रशिक्षणे घेतली, ज्यात १६१ जणी सहभागी झाल्या होत्या. स्थानिक प्रशिक्षिका तयार व्हाव्यात यावर यंदा जोर दिला होता. यंदा अशा ७ जणींनी यासाठी नव्याने काम केले. राम–सीता पुराणिक तंत्रनिकेतनात उद्योजकता मेळावा घेण्यात आला. याला ७ गावातून ३६ महिला उपस्थित राहिल्या. कुठलातरी उद्योग करावासा वाटणाऱ्या महिला या निमित्ताने एकत्र जमल्या होत्या. या



| ठिकाण | प्रशिक्षणे | उपस्थिती | प्रशिक्षिका |
|---|---|---|---|
| अडवली | शिवण वर्ग | १६ | दिपाली कामठे |
| अस्कवडी | शिवण वर्ग | २० | प्रतिभा कुंभार |
| भाटघर | शिवण वर्ग | १४ | दिपाली कामठे |
| वेल्हे | मणीकाम वर्ग(४) | १२ | कुंदा खंडाळकर |
| जीवनज्योती | राखी वर्ग (२) | १६ | अनिता यादव/ अश्विनी इंगुळकर |
| आंबवणे | चकली बनवणे | ६ | स्वाती पटवर्धन |
| आंबवणे | पापड बनवणे | ७ | भारती कामठे |
| जीवनज्योती | कापडी पिशव्या | १६ | हर्षदा शिंदे |
| शिवरे | पार्लर | १२ | स्वाती सुतार |
| वेल्हे | वाळवणे पदार्थ | ८ | सुरेखा दिघे |
| धानेप | मेहेंदी वर्ग | १० | लता सुतार |
| वेल्हे | वस्तूचे पॅकिंग करणे | ८ | भारती कामठे |
| रांजे | पॅलेट तयार करणे | ४ | भारती कामठे |
| कोंढावळे | शेवई बनवणे | २ | सुरेखा दिघे |
| **एकूण** | **२९** | **१२१** | **१२** |

**राम–सीता पुराणिक तंत्रनिकेतन अंतर्गत**

| गाव | प्रशिक्षणे | उपस्थिती | प्रशिक्षिका |
|---|---|---|---|
| शिवापूर | शिवण वर्ग | ३६ | स्वाती शिंदे |
| श्रीरामनगर | मेंदी वर्ग | १२ | पल्लवी दिघे |
| शिवापूर | संस्कार भारती | ८ | सुधा रहाणे |
| शिवापूर | मणीकाम वर्ग | ३० | प्रभा काचे |
| शिवापूर | कापडी पिशव्या | २० | स्वाती शिंदे |
| शिवापूर | राखी बनविणे | २५ | प्राची दाते |
| श्रीरामनगर | वाख वस्तू | ४ | लता प्रभूमिराशी |
| माळे गाव | मणीकाम वर्ग | २० | लता प्रभूमिराशी |
| जीवनज्योती | ब्युटीपार्लर | २ | कीर्ती कोंडे |
| जीवनज्योती | नर्सिंग कोर्स | १ | कीर्ती कोंडे |
| जीवनज्योती | शिवण वर्ग | ३ | कीर्ती कोंडे |
| **एकूण** | **११** | **१६१** | **७** |

मेळाव्यात आपापली उत्पादने एकमेकींना दाखवली व आपल्या अडचणी मांडल्या, त्यावर गटाने उपाय शोधले. त्या निमित्ताने आपल्या केंद्रात काय सोयी आहेत याचीही माहिती महिलांना मिळाली. शिवण येणाऱ्या काही जणी त्यानंतर घरी करायला काम न्यायला लागल्या.

**बैठका** : स्वयंरोजगाराचे काम पुढे नेण्यासाठी केंद्र कार्यालयात बैठका घेतल्या. अंबवणे १२, शिवापूर ८, वेल्हे ३ अशा एकूण २३ बैठका झाल्या.

## आरोग्य



१२ वर्षांपेक्षा जास्त काळ आपण आपली माजी विद्यार्थिनी डॉ. वैशाली बिनीवाले ही पाटणकर हॉस्पिटलच्या गटासोबत वेल्हे तालुक्यात गरोदर माता तपासणीसाठी येते आहे. त्याचा चांगला परिणाम दिसायला लागला आहे. महिन्यातून २ वेळा होणाऱ्या या तपासणीला आता दरमहा ८० पेक्षा जास्त गरोदर महिला किंवा त्यासंबंधी तक्रार असणाऱ्या महिला येतात. आपल्याकडे येणाऱ्या सगळ्या जणी आता दवाखान्यातच बाळंत होतात, नियमित औषधे घेतात व सुदृढ बाळाला जन्म देतात.

**तपासणी शिबिर** : ऑक्टोबर महिन्याचे १३५वे शिबिर पुणे स्त्री आरोग्य व प्रसूतीशास्त्र संघटना यांच्या सहकार्याने, ज्ञान प्रबोधिनी संचालित जीवनज्योती महिला सक्षमीकरण केंद्र आंबवणे या ठिकाणी झाला. यावेळी महिला आरोग्याच्या सर्व तक्रार निवारणासाठी महिलांना बोलावले होते. या विशेष तपासणीस ११९ महिला आल्या होत्या. त्यापैकी ८९ गरोदर होत्या. पुण्याचे संघटनेचे अध्यक्ष डॉ. निशिकांत श्रोत्री, त्यांच्या पत्नी डॉ. श्रोत्री, करंजावणे प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रमुख डॉ. राजेंद्र नांदेडकर, पाटणकर हॉस्पिटलचे डॉ. अरविंद व डॉ. मेधा पाटणकर, स्वतः डॉ. वैशाली बिनीवाले त्यांचे पती डॉ. पराग बिनीवाले असे डॉक्टर व स्टरलाईट टेक फौंडेशनच्या अध्यक्षा स्वतः ज्योती आगरवालही या कार्यक्रमास उपस्थित होत्या.



**कर्करोगाची जाणीव जागृती व तपासणी शिबिरे** : गेल्या वर्षी प्रमाणेच याही वर्षी गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची जाणीव जागृती व तपासणी शिबिरे झाली. डॉ. शुभांगी कानिटकर व डॉ. विद्या माणकीकर यांनी स्वेच्छेने त्यासाठी पुढाकार घेतला. गावागावात झालेल्या या शिबिरात ३०० पेक्षा जास्त महिला माहिती ऐकायला आल्या तर ६० पेक्षा जास्त जणींनी pap smear तपासणी करून घेतली. कोणालाही कर्करोग निदान झाले नाही, पण इतर इनफेक्शन संबंधी ६ ऑपरेशन्स दीनानाथ रुग्णालयात झाली.



**दत्तात्रय दाताचा दवाखाना** : सुधाताई देशपांडे यांनी मरणोत्तर १ लाख रुपये देणगी दिली. त्यातून आपण त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या पतीच्या नावाने दत्तात्रय दाताचा दवाखाना सुरू केला. दवाखान्याचे उद्घाटन २३ जुलैला केले. उद्घाटन कार्यक्रमाला कै. दत्तात्रय देशपांडे यांचे नातेवाईक आले होते व १२ गावांतून ३२ जणी आल्या होत्या. हा दवाखाना त्या दिवसानंतर पाक्षिक चालवायचा असे ठरले. या दवाखान्यामुळे ग्रामस्थांची चांगली सोय झाली. ३१ मार्च अखेर या दवाखान्यात १८ वेळा दातांच्या तपासण्या झाल्या व उपचार केले गेले. या सर्व तपासण्यात मिळून एकूण ३१ गावातील १४६ जणांनी उपचार करून घेतले. त्यापैकी १०० पेक्षा जास्त जण असे होते की जर हा दातांचा दवाखाना नसता तर त्यांनी कुठेही जाऊन उपचार करून घेतले नसते. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या डॉ. वैदेही केळकर या माजी विद्यार्थीनीने सहकाऱ्यांसोबत या दवाखान्याची जबाबदारी घेतली म्हणूनच केवळ हे शक्य झाले.

**डोळे तपासणी शिबिर** : आंबवणे गावाला डोळे तपासणी शिबिर झाले, त्यात ३० जणांची तपासणी झाली. ६ मोती बिंदूचे रुग्ण आढळले, त्यापैकी ३ जणांची शिरवळला शस्त्रक्रिया झाली.

## महिला दक्षता समिती

वेल्हे पोलीस स्टेशनशी संलग्न असणारी महिला दक्षता समिती ही आपल्या प्रशिक्षणामुळे जास्त चांगले काम करते. या महिन्यात कौटुंबिक हिंसाचार व महिला हिंसाचाराच्या ३ केसेस आल्या होत्या, त्या संदर्भात या समितीतील सदस्यांनी समुपदेशनाचे काम केले. त्याशिवाय दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या ५ एकल महिलांना राष्ट्रीय कुटुंब विमा योजनेअंतर्गत २०,०००/– रुपयाचा धनादेश मिळवून दिला.

**एकल महिला**: गेली काही वर्षे नव्याने सुरू केलेला हा विषय. ज्या महिला एकट्या रहातात त्यांना काही वेगळ्या अडचणी येत आहेत असे लक्षात आले. या अडचणी आर्थिक तर असतातच पण त्याच बरोबर सामाजिक, कौटुंबिकही असतात. अशा महिलांना रोजचं आयुष्य जगताना सुद्धा अनेकदा कुटुंबा– बाहेरचा कोणाचा तरी आधार हवा असतो. म्हणून आपण शिवापूर–वेल्हे–आंबवणे इथे अशा एकल महिलांचे या पूर्वी मेळावे घेतले. तसाच एक मेळावा मे महिन्यात नसरापूरमध्ये घेतला. २३ गावातून १४८ महिला मेळाव्याला आल्या होत्या. मेळाव्यात एकल महिलांसाठी असणाऱ्या संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना अशा सरकारी योजनांची माहिती दिली. त्या शिवाय अशा ३ एकल महिला की ज्यांनी धाडस करून स्वतःच्या आयुष्यात, मैत्रिणींच्या मदतीने परिस्थितीवर मात केली अशांचे अनुभव कथन झाले. ज्या कोणी शासकीय योजनेच्या लाभार्थी होऊ शकतील त्यांना शासकीय अर्जही दिले. अपंग आहे पण





शासन दाखला नाही, श्रावणबाळ योजनेत बसते पण अर्ज कसा करायचा माहित नाही अशाही अनेक जणी या मेळाव्याला आल्या होत्या. मेळाव्याला प्रतिसाद चांगला मिळाला. वर्षभरात गावोगावच्या २७६ एकल महिलांच्या वैयक्तिक माहितीचे फॉर्म भरून घेतले. आपल्या प्रयत्नांमुळे यापैकी ६३ जणींचे शासकीय योजनेच्या लाभार्थी होण्यासाठी काम केले. त्यापैकी, ३५ महिलांना सरकारी योजनेतून लाभ मिळायला सुरुवात झाली आहे.



असाच एक मेळावा १४ मार्च रोजी जीवनज्योतीमध्ये झाला. त्याला ३० जणींना बोलावले होते. तहसीलदार कचेरीत या संबंधी काम करणाऱ्या अधिकारी मार्गदर्शनासाठी आल्या होत्या. विशेष म्हणजे एकल महिला कुटुंब प्रमुख असणाऱ्या कातकरी कुटुंबाचे रेशन कार्ड मिळण्याचे जे प्रश्न होते त्यावर चर्चा होऊन मार्ग निघाला हे अतिशय महत्त्वाचे होते. कारण तिच्या नावावर स्वतंत्र रेशन कार्ड असेल तरच योजनेचे लाभार्थी होता येते यावर बोलणे झाले.

एकल महिला हा विषय कामासोबत अभ्यासाचाही केला. प्रज्ञा मानस विभागाच्यावतीने घेतलेल्या क्वालिटी ऑफ लाईफ वरच्या आंतर राष्ट्रीय परिषदेत 'एकल महिला' या विषयावर पेपर सादर केला.

## नेतृत्व विकसन

**सहल:** महिलांची सहल आयोजित करणे हे स्थानिक नेतृत्व उभारणीसाठी अनुभव शिक्षण देणारा उपक्रम म्हणून आपण योजतो. यंदा ५ गावातील महिलांची १० जून रोजी तिरुपती बालाजी येथे ५ दिवस मुक्कामी सहल जाऊन आली. या सहली मध्ये ३५ महिला सहभागी झाल्या होत्या. या सहली मध्ये नव्याने कांचीपूरम या गावाला भेट दिली.



**दप्तर वाटप :** नेतृत्व विकसनाचा एक भाग म्हणून गावातील गरजू मुलांना शोधून त्यांना सेवा सहयोग संस्थेकडून मिळालेली २४० दप्तरे ४० गावांमध्ये वाटली.

**'स्त्री शक्ती प्रबोधन सप्ताह'** : ३ जानेवारी सावित्रीबाई फुले जयंती ते १२ जानेवारी जिजामाता जयंती या कालावधीत 'स्त्री शक्ती प्रबोधन सप्ताह' साजरा केला. त्यात ग्रामीण स्त्री शक्ती प्रबोधनाच्या प्रत्येक आयामाचा एक कार्यक्रम ठरवला होता.

सर्व विभागांनी अतिशय उत्साहाने हे कार्यक्रम केले. हा कालावधी महिलांना गोळा करायला अतिशय योग्य वाटला. बहुतेक सर्व जणी गावागावातून स्वखर्चाने आल्या हे विशेष!

**नेतृत्व प्रशिक्षण बैठक** : ही बैठक जून पासून चालू केली. वर्षभरात ९ बैठकी झाल्या. या बैठकीमध्ये १५ गावातून १८ महिला नियमित बैठकीला येतात. दर महिन्याला गावातल्या एखाद्या प्रश्नावर चर्चा करून गावगाडा चालण्यात महिलांचे योगदान अधिक व्हावे व त्यांच्या क्षमतांचा विकास व्हावा ही त्या मागची कल्पना. म्हणून निर्वाचित महिला ग्राम पंचायत सदस्यांचा प्रशिक्षण वर्ग घेतला. ५ महिने महिन्यातून एकदा झालेल्या या वर्गाला वनिताताई पटवर्धन यांनी मार्गदर्शन केले.



**महिला मेळावे:** महिलांसाठी मेळावे घेणे ही निवडक महिलांसाठी नेतृत्व संधीच ! अशी संधी घेण्याचे प्रशिक्षण वर्षभर बैठकीत चालू असते. एप्रिलमध्ये हिशोबाचे मेळावे होतात ज्यात गाव पातळीच्या सर्व गटांचे एकत्रित हिशोब सांगितले जातात. स्वतः गट घेतात हिशोब चोख ठेवतात अशा महिला या मेळाव्यात हिशोब सांगायला मदत करतात. यंदा **१८ गावात हिशोबाचे मेळावे** झाले.

नवरात्रीच्या दिवसात नवीन गावी कामाच्या विस्तारासाठी मेळावे होतात. ते गटाने जाउन घ्यायचे असतात. या मेळाव्यात स्पर्धा घेऊन बक्षिस वाटप असा कार्यक्रम असतो व योजक, धडपडणाऱ्या कार्यकर्तीचा

**'स्त्री शक्ती प्रबोधन सप्ताह'कार्यक्रम**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | ३ जाने | तोरणा चढणे | १७ जणी | ६ गावे | नवचेतना बैठक सदस्य |
| २. | ३ जाने | सावित्री स्मरण | ४० जणी | २२ गावे | जीवनज्योती युवती गट |
| ३. | ५ जाने | स्पर्धा परीक्षा ओळख | ३० जणी | १० गावे | युवती गट |
| ४. | ९ जाने | नवनिर्वाचित महिला सदस्य मेळावा | २३ जणी | १७ गावे | नेतृत्व विकास |
| ५. | १० जाने | स्वयंरोजगार मेळावा | २३ जणी | १० गावे | स्वयंरोजगार गट |
| ६. | १२ जाने | वक्तृत्व स्पर्धा | ४८ महिला | ३२ गावे | नेतृत्व गट |

सत्कार असे मेळाव्याचे स्वरूप असते. नवरात्रीमध्ये **७ दिवसात ५२ गावात १४२०** सहभागींचे मेळावे घेतले. (याचा स्वतंत्र वृत्तांत शेवटी दिला आहे.)



या शिवाय संक्रांतीच्या दिवसातही गावात मेळावे होतात. त्यासाठी गावातले गट एकत्र येऊन निधी उभा करतात. यंदा **संक्रांतीचे हे स्नेहमेळावे २१ गावात झाले.** त्या पैकी ६ गावात ग्रामपंचायत १०% निधीतून हे मेळावे घेण्यात आले. गावातल्याच गटाने नियोजन करून गावातल्या महिलांसाठी संक्रांत वाण आणून लुटले, सगळे नियोजन गावातल्या गटांनी पुढाकार घेऊन केले. मेळाव्यात स्त्री जन्माचे स्वागत करण्यात आले व त्याच्या आईचे पण स्वागत करण्यात आले व प्रत्येक मुलीच्या नावाने विमा पॉलिसी काढण्यात आली. काही गावांना शिष्यवृत्ती देण्यात आली. संक्रांतीच्या या मेळाव्याला सगळ्या गावात मिळून ६५० पेक्षा जास्त जणी सहभागी झाल्या तर प्रत्येक गावात मेळाव्यासाठी काम करणारा ७ जणींचा गट कुठली तरी जबाबदारी घेणारा उभा राहिला.

**गेळगणे विशेष!** : गावासाठी धडपडणारी एखादी ताई गावात असली की छोट्याशा वस्तीवरही कसा एकदम बदल होतो ते गेळगणे वस्तीवर झाले! गेळगणे गावाला या वर्षी बचत गट सुरू झाला. त्यामुळे त्यांना महिलांच्या तोरणा सहलीची माहिती कळली त्यात ७ जणी सहभागी झाल्या. तोरण्याच्या सहलीतून त्यांना प्रेरणा मिळाली. मग त्यांनी गावातल्या महिलांची पहिल्यांदाच देहू–आळंदीला सहल काढली. त्यात १७ जणी सहभागी झाल्या. मग त्यांनी गावात संक्रांत मेळावा घेतला. तेव्हाच हिमोग्लोबिन तपासणी पण ठरवली. त्यात ६५ महिला–पुरुषांनी तपासणी केली. १० पेक्षा कमी हिमोग्लोबिन असणारे १२ जण आढळले. गावात कालिका जोशी यांनी जाऊन त्यांचे संक्रांत हळदी कुंकू गेळगणे वस्तीवर केले व गावातील बालवाडी पालकांना छत्र्या लुटल्या. आता गावातल्या महिला गावासाठी कामाला लागल्या!

## स्फुट

### विशेष भेटी

शब्द ते शक्ती प्रकल्पासाठी गेली ८ वर्षे अर्थसाहाय्य देणाऱ्या श्री अनंत सेटलवाड यांची कामाला वर्षात २ वेळा भेट झाली. या वेळी त्यांनी नव्याने सुरू केलेल्या दल व हिरकणी उपक्रमाची तपशीलात माहिती घेतली तर वेल्हे अंगणवाडी प्रकल्प समन्वयक व वेल्हे समाचार चे संपादक श्री. दिलीप फडके यांच्याशी तालुका विकासासंबंधी चर्चा केली.

एन. जी. परांजपे प्रतिष्ठानच्या नेहाताई व स्मिताताई या परांजपे कुटुंबियांनी वेल्ह्याच्या जास्वंद गिरिकन्या निवासाला भेट दिली. निलांगी व नरेंद्र सरदेशपांडे यांनी श्री. देसाई यांच्या सह वेल्हे प्रकल्पाला भेट दिली.

### खोपी गावातील जागतिक महिला दिन

आपल्या कामाचा मूळ हेतू स्थानिक मनुष्यबळाचे विकसन हा आहे. या कालावधीत असे काही प्रसंग घडले की हा हेतू साध्य झाल्याचे समाधान मिळाले. ८ मार्च जागतिक महिला दिनाला खोपी गावातील महिलांनी मेळावा घेतला, त्यासाठी लागणारा खर्च शासनाकडून मिळवला. गावात १०० जणींचा यशस्वी मेळावा घेतला. त्याला गट विकास अधिकारी व स्त्री शक्ती प्रबोधन विभाग प्रमुख यांनी मार्गदर्शन केले.

### दख्खन जत्रेत सहभाग

दख्खन जत्रेत सांगवीच्या बचत गटांनी स्टॉल्स मिळवले व जवळ जवळ १३० जणी शासन खर्चाने जत्रेला जाऊन आल्या. स्टॉल्स कशाचे लावता येतील याचे आपण मार्गदर्शन केले.

### अमेरिकेतील विद्यार्थी

**पुण्यामध्ये अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन स्टडिज् आहे. तिथे अमेरिकेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी शिकायला येतात. वर्षात २-३ वेळा त्यांच्या विद्यार्थ्यांचे गट आपल्या ग्रामीण भागात येतात. ते गावोगावी जातात, विद्यार्थ्यांशी बोलतात, महिलांशी बोलतात, इथले प्रश्न समजून घेतात. त्यानिमित्त आपल्या निवासातील मुलींना परदेशी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळते. गेल्या तीन वर्षात मिळून चार जणींनी आपल्या कामावर अभ्यास करून त्यांचे छोटे पेपर सादर केले. ज्यामध्ये उद्योजकता विकास, ग्रामीण भागातील नेतृत्व विकसन, बचत गटामुळे होणारे महिलांमधील बदल असे विषय अंतर्भूत होते.**

### संशोधन प्रकल्प सहभाग

ज्ञान प्रबोधिनीच्या संशोधन संस्थेने महिला आयोगा सोबत 'सबला' प्रकल्प केला. महाराष्ट्र भरातल्या निवडक जिल्ह्यातल्या काही संस्था त्यासाठी निवडल्या ज्या महिलांसाठी काम करत आहेत. लाभार्थी महिलांवर, महिला प्रश्नावर काम करणाऱ्या या संस्थांच्या कामाचा काय परिणाम झाला हे बघणे असा अभ्यास करायचा होता. त्यात कौटुंबिक हिंसाचाराचाही अभ्यास होता. आपल्या दक्षता समितीच्या कामामुळे या बाबतीतला आपला अनुभव इथे उपयोगी पडला. आपल्या ५ कार्यकर्त्यांनी मिळून जवळ जवळ २२ दिवस यासाठी काम केले व एक नवा अनुभव घेतला. त्यानिमित्ताने महिलांसाठी काम करणारी संस्था असली की संस्थेच्या कार्यकर्त्यांमध्ये व लाभार्थींमध्ये वेगवेगळ्या उपक्रमांमुळे कसे चांगले बदल होतात याची नवनवीन माहिती कळली. आपल्या कार्यकर्त्या विचाराने समृद्ध व्हायला या देशाटनाचा उपयोग झाला.

पुण्यामधल्या वैकुंठ मेहता को–ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट या संस्थेने २ दिवस जेन्डर बजेटवर राज्यस्तरीय कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत सुवर्णा गोखले यांनी प्रशिक्षक म्हणून काम करायची संधी घेतली, त्यांनी २ दिवसात ६ सत्रे घेतली. पुण्यात रिजर्व्ह बँकेचे कॉलेज आहे तिथल्या सेंटर फॉर इंटरनॅशनल कोऑपरेशन अँड ट्रेनिंग इन अॅग्रीकल्चरल बँकिंगच्या वतीने दर वर्षी सार्क देशातल्या बँक अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण घेतले जाते. या प्रशिक्षणात आपले बचत गट, बँक जोडणी, आर्थिक साक्षरता या विषयीचे अनुभव सांगायला सलग ४ वर्षे संधी मिळते आहे.

**आपल्या कामावर अभ्यास :**

१. या वर्षी देशांतर्गत झालेल्या परिषदेमध्ये आपल्या कामावर केलेले संशोधन मांडायची संधी घेतली. त्यात इंटरडिसिप्लीनरी रिसर्च इन कॉन्टेमपररी वूमन्स स्टडीज या परिषदेत आपल्या बचत गटामुळे खोपी गावातल्या प्रत्येक घराचे जे बँकेत खाते काढण्याचे काम १००% यशस्वी झाले होते, त्या कामावर लिहिलेला पेपर संमत झाला व १३ एप्रिल रोजी झालेल्या परिषदेत तो वाचण्याची संधी मिळाली.

२. प्रज्ञा मानस विभागाने देशांतर्गत घेतलेल्या जीवन गुणवत्ता विषयीच्या परिषदेत डॉ. वनिताताई पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाने केलेल्या एकल महिलांच्या कामावरचा अभ्यास मांडण्याची संधी घेतली.

३. ज्ञान प्रबोधिनीतील प्रशालेच्या १०वी च्या मुली भविष्यवेध शास्त्र शिकतात व त्याचा अभ्यास करण्यासाठी एक विषय निवडतात. तसे यंदा ३ गटांनी ग्रामीण विषय निवडून गावाला मुक्काम करून, ५०–६० जणींच्या मुलाखती घेऊन भविष्य मांडण्याचा प्रयत्न केला. त्यात आंबवणे गावातील बदलणाऱ्या रोजगार संधी, कुसगावातील पशुधन व केळद गावातील वाढणारा ऊर्जेचा वापर असे विषय घेतले होते. त्याला आपल्या कार्यकर्त्यांनी मार्गदर्शन केले.

ग्रामीण भागात इंटरनेट तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे पण त्या बरोबर ग्रामीण जनता वाचू शकेल असा मराठी मजकूर त्या गतीने वाढत नाही, म्हणून आपण मराठी विकिपिडीयाच्या कार्यशाळा घेऊन ग्रामीण माहिती अधिकाधिक वाचनास उपलब्ध होईल असा प्रयत्न करत आहोत. आपल्या भागातल्या मुलींच्या मदतीने शिवगंगा–गुंजवणी खोऱ्यातील ८२ गावांची माहिती स्थानिक मुलींनी अपलोड केली व २४ ग्रामीण दागिन्यांची फोटोसह माहिती उपलब्ध केली आहे, जी आता जगभरच्या कोणालाही उपलब्ध आहे.

आपल्या कामाच्या आधारावर कामाची माहिती कळावी म्हणून यंदा लोकसत्ता चतुरंग पुरवणीत २ लेख लिहिले तर ॲग्रोवन वर्तमान पत्रात आर्थिक साक्षरतेवर जानेवारी २०१८ पासून सदर सुरू झाले ३१ मार्च पर्यंत त्याचे ८ लेख प्रसिद्ध झाले.

विशेष लेख १

## नवरात्र मेळावे २०१७



नवरात्र मेळाव्याचे हे तिसरे वर्ष! ह्या वर्षी मेळावे घेण्यासाठी घेणाऱ्या गटात उत्सुकता होती. गणपती नंतर सप्टेंबरमध्ये कार्यकर्त्यांची मेळाव्यासंदर्भात आंबवणे गावात म्हणजे गेल्या वर्षीच्या तुलनेने हायवे पासून लांब दुर्गम भागातल्या गावात बैठक घेतली. गेल्या वेळेपेक्षा जास्त गावात मेळावे घेण्याचे गटाने मिळून ठरवले. गेल्या वर्षी ३१ गावे झाली होती तर यंदा ४५ गावे करायची ठरवली.

गटाने मेळाव्याचे उद्दिष्ट सहज दीडपट केले म्हणजे ज्या कारणासाठी मेळावे घ्यायचे ते नक्की साध्य होणार! ठरवून काम केल्यामुळे गटाचा विश्वास वाढणार असं वाटलं! त्यातही चर्चा करताना गटाने गावे अशी सुचवली की जिथे सध्या तरी प्रबोधिनीचे कुठल्याही प्रकारचे काम चालू नाही. नवीन गावात कामाला सुरुवात करताना 'पहिला संपर्क' हाच खरंतर कळीचा मुद्दा असतो!

नवरात्रीच्या दिवसात घट बसण्याचा दिवस आणि दसरा हे २ दिवस सोडून उरलेले ७ दिवस मेळावे घ्यायचे होते. ७ दिवसात ४५ गावात मेळावे घ्यायचे ठरवणे म्हणजे जरा धाडसच होतं. एकेका दिवशी ६–७ गावात तरी मेळावे घ्यायला लागणार होते.

या वर्षी या दिवसात अपेक्षेपेक्षा खूप जास्त पाऊस पडला ....इतका पडला की ठरलेल्या वेळी काही ठिकाणी मेळावे होऊच शकले नाहीत. पण सांगण्यास अतिशय आनंद होतो की तरीही नियोजना प्रमाणे सर्व मेळावे कोजागिरी पर्यंत गटाने पूर्ण केलेच. ठरवले ते सर्व मेळावे तर केलेच पण गेल्या वर्षी सारखेच यंदाही नियोजनापेक्षा ७ मेळावे जास्त घेतले.

**मेळाव्याचे स्वरूप:**

किमान २ दिवस आधी गावात जायचे आणि महत्त्वाच्या किमान ३ महिलांना भेटून मेळाव्याची निश्चिती करायची. मेळाव्याच्या आदल्या दिवशी गावातल्या फळ्यावर आठवण म्हणून परत निरोप लिहिला जाईल असे बघायचे. मेळाव्याच्या दिवशी जिने जबाबदारी घेतली आहे तिने ११ वाजता आपापले गावात पोचायचे, स्पीकर लाऊन घ्यायचा. महिलांना बोलवायचे, सतरंजी मिळवून घालायची, खाऊ वाटप बक्षिस सांभाळणारी गावातली तयार करायची. हे सगळे करेपर्यंत अजून किमान ३ जणी मेळावा घेण्यासाठी मदतीला यायच्या. तोपर्यंत महिला जमलेल्या असायच्या. मग गाणे सांगायचे, मेळाव्याचे स्वरूप सांगायचे, प्रस्तावना करायची, प्रबोधिनीच्या कामाची माहिती सांगायची, मग देवी स्तोत्र म्हणायचे, स्पर्धा घ्यायच्या, बक्षिस समारंभ करायचा, धडपड करणारीचा सत्कार करायचा. हळदी कुंकू देऊन खाऊ वाटप व्हायचा.



हे सगळं करायला साधारण २–२.१५ तास लागायचे. त्यापेक्षा जास्त वेळ लागला तर मेळावा रंगला असे व्हायचे!

या वर्षी एक मेळावा गाव पातळीवर झाला म्हणजे गावातल्या कमीत कमी ३ जणी व जास्तीत जास्त ८ जणी कामाला लागल्या असे म्हणायला हरकत नाही, एवढे नियोजन केले होते. तशी जबाबदारी वाटप केले होते. म्हणजे जी पुढे काम करेल असे वाटते तिच्याकडे बाहेर गावातून आलेल्या महिलांचे पेयपान करण्याची जबाबदारी द्यायची, म्हणजे तिचा कामाचा व काम करणाऱ्या महिलांचा अधिक संपर्क होईल.

**मेळाव्याची वैशिष्ट्ये**

* नियोजना प्रमाणे ४५ गावात मेळावे तर झालेच पण सात गावात जास्तचे मेळावे झाले, एकूण **५२ गावात** मेळावे झाले.

✻ ५२ मेळाव्याला मिळून एकूण **१४२० महिला** सहभागी झाल्या. भागातली शेतीची कामे ऐन हंगामात आली होती. भुईमूग, सोयाबीन काढायला आले होते. तरीही एवढ्या महिला मेळाव्यासाठी जमल्या हे विशेष!

✻ या निमित्ताने **१२२ जणी** आपले गाव सोडून दुसऱ्या गावात **मेळावे घेण्यास गेल्या.** त्यांना कामाची संधी मिळाली / त्यांनी ती घेतली. १२२ पैकी **५४ जणी** मेळावे घ्यायला **प्रथमच बाहेर पडल्या**.



✻ ज्या गावात आपले बचत गटाचे काम चालू होते त्याच्या जवळच्या **३४ गावात प्रथमच मेळावे झाले**. त्यांना मेळावे इतके नवीन होते की मेळावा म्हणजे काय तो फार तर फार १० मिनिटे हजेरी लावू असे वाटून त्या गावातल्या बायका डोंगरात गुरांसाठी गवत काढायला चालल्या होत्या म्हणून विळा घोंगडी घेऊन मेळाव्याला आल्या नि खेळतच बसल्या! असा आनंद त्यांनी लुटला असे घेणाऱ्या सांगत होत्या.

✻ काही वस्त्यांवर **बालवाडी ताईच्या मदतीने मेळावे घेतले** तिथे स्पर्धा म्हणून एके ठिकाणी अगदी बेडूक उड्याही घेतल्या. आई पालक मुलांसारखे खेळले, एकीने मुलाला सांगितले '**आज आम्ही शाळेत जाऊन तुमच्या सारखी मजा केली**'.

✻ पूर्वी मुख्य गावात मेळावा झाला होता पण या वर्षी ठरवून गावाच्या जवळच्या **वस्तीतही घेतला**. घेणाऱ्या म्हणत होत्या, 'नाहीतर त्यांना कधी कळणार मेळावा कसा असतो ते?' म्हणून मुद्दाम घेतला. घेणाऱ्यांच्याही कक्षा रुंदावल्या!

✻ अगदी १५-२० घरं असणाऱ्या डोंगरावरच्या **वाडी-वस्तीवरही यंदा मेळावे घेतले**.

✻ एका नवीन गावात मेळावा घ्यायचा होता तर घेणारी आधी शेजारच्या गावाच्या मेळाव्याला आली. म्हणाली, 'आधी बघावं म्हंटलं मेळावा म्हणजे काय ते!.... काही बाही भलतंच असलं तर गावाच्या बाया मला धरून बदडतील!'..... आणि **तिने तिच्या गावात आनंदाने मेळावा घेतला.**



✻ गेल्या वर्षी प्रमाणेच यंदाही उपासाच्या खाद्य पदार्थाची स्पर्धा घेतली होती. 'पौष्टिक पदार्थ बनवणे' या वर यंदा जास्त भर होता. काहींनी टी.व्हीवरचे खाद्य पदार्थाचे कार्यक्रम बघून **वर्षभर 'नवरात्र मेळाव्यात करू' असे नियोजन** यंदाही केले होते. वरीचे लाडू, वरीचा खजूर घालून केक असे काही अभिनव पदार्थही होते.

सलग तिसऱ्या वर्षी जिथे मेळावे घातले अशा गावात जास्त संख्येने स्पर्धक होते. पहिल्या वर्षी जिथे ३ पदार्थ होते तिथे सगळ्यात जास्त म्हणजे २७ पदार्थ होते. पण आपण निवड करून ३ जणींना बक्षिसे दिली म्हणून उरलेल्या नाराज झाल्या. खपून भाग घेणाऱ्या प्रत्येकीला बक्षिस हवे होते.

✻ स्पर्धेची बक्षिसे खरेदी करणे ते वाटप करणे सगळे **स्थानिक महिलांनी पुढाकाराने केले**. घाऊक बाजारात भाव करून, ओळख काढून, ५०० रुपयात ११००-१२००/- रकमेची बक्षिसे आणली.

✻ या वर्षी बहुतेक गावात रांगोळी, स्पीकर अशी **व्यवस्था गावाच्या वतीने (गावाच्या खर्चाने**) केली होती.

✻ गावच्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका लागल्या. काही महिलांना निवडणुकीचे अर्ज भरायचे होते. त्या **काही जणी निवडणूक अर्ज भरून मग मेळाव्याला आल्या.** तशी मेळाव्याचे वेळ त्यांनी ठेवली म्हणजे मेळावा बुडायला नको.

✻ मेळावा घेणारा १९ कार्यकर्त्यांचा गट रोज लवकर घरा बाहेर पडून रात्री उशिरा घरी परतत होता. या **मेळाव्यातून त्यांना वर्षभर कामाची उर्जा मिळाली.**

✻ मेळाव्यात धडपडणाऱ्या गाव पातळीवरच्या कार्यकर्तीचा साडी देऊन सत्कार केला. हितचिंतकांकडून देणगी स्वरूपात गोळा या शिवाय मेळावा घेणाऱ्या महिलांना काही तरी महत्त्वाचे समजले. त्या म्हणाल्या, 'वर्षभर ज्या गावात काम करतो तिथे महिला आता आपलं ऐकतात.', 'एरवी देवळात पुरुष मंडळी पत्ते खेळायला बसत असली तरी त्या दिवशी मात्र त्यांनी आम्हाला देऊळ मोकळे करून दिले.' 'महिलांचा आनंद पाहून आनंद वाटला.' 'हिम्मत करून जबाबदारी घेतली ती पार पाडू शकले. बर वाटलं', 'घरच्यांसोबत बोलायची हिम्मत वाढली', 'मेळाव्यात फक्त 'महिला' असतात म्हणून मोकळेपणा वाटतो', एका गावात तर नुकतीच आदल्या दिवशी मयत झाली होती तरी आधीच ठरवलं होतं असं पुरुष माणसांना पटवून देऊ शकलो आणि खेळलो!

असे झपाटून मेळावे घेतले आणि कारणी लागले. ज्या नवीन गावात या वर्षी पहिल्यांदा मेळावे घेतले तिथे काम वाढणार हे नक्की. असे वाढलेले काम पेलणारा गट यामुळे उभा राहिला ही खरी निष्पत्ती!

..... आणि गेल्या वर्षी सारखीच यंदाही ..... आता पुढच्या वर्षी '...असे करू या' अशी आशा निर्माण झाली!

विशेष लेख २

## नवा विक्रम : गावांमध्ये विज्ञान मेळावे



किशोरी विकस या उपक्रमात दर वर्षी उन्हाळी सुट्टीमध्ये आपण आपल्या खोऱ्यातील गावांमध्ये गाव पातळीवर विज्ञान मेळावे घेतो. या मेळाव्यांची नियोजन बैठक ८ मे २०१७ रोजी झाली. त्या बैठकीला वेल्हे परिसरातील युवती व ज्ञान प्रबोधिनीत अनुभवासाठी आलेल्या सामाजिक शास्त्रात पदवी मिळवणाऱ्या (एम एस डब्ल्यू) युवती

अशा १८ जणी होत्या. मेळाव्यात काय घ्यायचे?, कुठल्या गावात मेळावे घ्यायचे?, किती गावात घ्यायचे? अशी चर्चा बैठकीत होऊन १०० तरी गावात मेळावे घेऊन २००० मुला-मुलीं पर्यंत पोहोचायचे असे ठरले.

किमान ५ विज्ञान प्रयोग, गणिती खेळ व भाषिक खेळ व पद्य असे मेळाव्यांचे वेळापत्रक ठरवून १० मे २०१७ पासून गावा-गावात मेळावे घेण्यास सुरुवात झाली. १८ जणींचा गट २ गाड्यांतून सकाळीच वेल्ह्यातून निघायचा नि एकेका गावात २-२ जणी अशा उतरत ८-९ गावात/ वाड्या वस्त्यांमध्ये मेळावे घेण्यास दाखल व्हायच्या.

काहीना गावांचा रस्ता माहित होता तर काहींना मुलांना एकत्र करता येत होते. काहींना छान गाणं म्हणता येत होतं तर काहींना मुलांना खेळामध्ये रमवणं जमत होतं. अशी प्रत्येकीची काहीना काही खासियत होती. त्यामुळे मेळावे घेणारा गट एकमेकींना परस्पर पूरक होता.

हे मेळावे सुट्टीमध्ये आणि गावपातळीवर घेणार असल्याने जास्तीत जास्त कसरत करावी लागायची, ती म्हणजे मुलांना रानावनातून गोळा करून दोन तास एका जागेवर बसवायची. पहिले दोन-तीन दिवस मेळावे घेऊन संध्याकाळी युवती एकत्र आल्यावर चर्चा करत होत्या, की ताई गावात मुलंच नव्हती आणि जी होती ती यायला तयार नव्हती. मग काय करायचे त्यावर गटानेच पर्याय शोधला. मेळाव्याच्या चौथ्या-पाचव्या दिवशी सरावाने प्रत्येकीला मुलांना गोळा करणे ही अडचण वाटेनाशी झाली. **सगळ्यांनी मिळून ठरवलेलं उद्दिष्ट पूर्ण करायचंच** अशी तळमळ गाडीतून एकत्र प्रवास करताना त्यांच्या होणाऱ्या चर्चेतून जाणवत होती.

ज्या गटासाठी मेळावे घेतले तो वयोगट ५ वी ते १०वी पर्यंतची मुलं-मुली असा होता. पाच प्रकारचे प्रयोग हवेचा दाब, कंपनं याचे प्रयोग तसेच बैठे व मैदानी खेळ, कागदी फुलं बनविणे असे दोन तासाचे वेळापत्रक मेळाव्याचे होते. या मेळाव्यांमधून ग्रामीण मुला-मुलींमधील विज्ञान दृष्टी विस्तारणे व प्रश्न विचारायला शिकवणे. का? कसे? कशासाठी? असा चौकस दृष्टिकोन वाढायला नक्कीच मदत झाली. छोट्या छोट्या विज्ञानातील प्रयोगाने 'हे असे घडते किंवा घडू शकते' असा विचार करायला मदत झाली असे वाटते. आपण शिकविलेले प्रयोग अगदी सध्या सहज मिळणाऱ्या साहित्यातून करायला दिल्यामुळे मुलांनी हे सगळे सहज आत्मसात केलेले दिसले. (सर्वच गावांमधून दोन तासांचा मेळावा घेऊन पूर्ण झाला. तरी ताया गावामधून बाहेर पडेपर्यंत एकही जण मेळावा सोडून न जाणे ही आमच्यासाठी विशेष गोष्ट होती.) मेळाव्यांच्या निमित्ताने एकत्र राहणे, एकत्र प्रवास यामुळे मेळावे घेणारा गट एकत्र बांधला गेला. त्यांची चांगली मैत्री झाली, एकमेकींबद्दलचा विश्वास वाढला गेला. १० मे ते २५ मे या पंधरा दिवसात मिळून १०० गावांमध्ये २००० मुला-मुलींपर्यंत पोहोचणे तर झालेच पण गटाचा विश्वास वाढल्याने त्यांनी उद्दिष्टच २५०० केले! २५ मे नंतर गावं ११५ झाली होती परंतु वाढीव संख्येचे उद्दिष्ट पूर्ण व्हायला २५ संख्या कमी होत्या. यावरच समाधान मानत आम्ही मेळावे घेण्याचे थांबिवले व सर्व मुली आपापल्या गावी गेल्या. दहा-बारा दिवसानंतर पुन्हा एकत्र मेळाव्याची शोधबोध बैठक होती. सगळ्या जणी एकत्र बैठकीला बसलो आणि शामल शिंदे म्हणाली, ताई आपलं ठरवलेलं उद्दिष्ट पूर्ण झालं. म्हंटलं कसं? तर म्हणाली ताई मी सुट्टीला गावी गेले, आमच्या गावात आपण मेळावा घेतला होता पण गावाची वाडी आहे तिथे आत्मविश्वास अगदी जग जिंकल्यासारखा वाटत होता.

हा आत्मविश्वास व पराक्रम करण्याची खुमखुमी आपल्या भागापेक्षा नवीन ठिकाणी नवीन गावांमध्ये म्हणजे जे ठिकाण या सगळ्या प्रक्रियेतून आम्हा सर्व तायांचे खूप महत्त्वाचे शिक्षण झाले. वेल्ह्यातील अतिदुर्गम भागातील गावांमधील परिस्थिती या मेळाव्याच्या निमित्ताने खूप जवळून बघता आली. दोन तासाच्या सोबतीने का होईना मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद आम्ही आमच्या मनात टिपून ठेवला आहे. दरवर्षी अशाप्रकारचे जास्तीतजास्त मेळावे व अन्य ठिकाणी नवीन गावांमधून मेळावे घेण्याचे आम्ही ठरविले आहे.

विशेष लेख ३

## आत्मप्रचिती परिसंवाद



साधारण गेल्या १० वर्षात स्त्री शक्ती प्रबोधन ग्रामीण विभागाच्या कामाने शिवगंगा गुंजवणी खोऱ्यात आपला ठसा उमटवला आहे. या प्रक्रियेचे संकलन झाले पाहिजे असे वाटले. म्हणून **आत्मप्रचिती परिसंवादाची योजना** केली. या परिसंवादामध्ये काम करणाऱ्या गटाने आपापल्या विषयाचे सादरीकरण करायचे, ज्यामध्ये केलेल्या दशकाच्या कामाचा धांडोळा घ्यायचा असे ठरवले.

नुसतेच संकलन करून थांबायला नको तर ज्यांच्या सोबत...... ज्यांच्या साठी..... ज्यांच्या मार्गदर्शनाने काम केले त्यांनाही हे समारंभपूर्वक सांगूया.....म्हणून आत्मप्रचीती परिसंवाद आयोजित केला होता.

गेल्या १० वर्षात जिने जबाबदारी घेऊन हे काम केले तिनेच कामाचे सिंहावलोकन करावे अशी कल्पना होती. त्यासाठी या कालावधीतल्या सगळ्या कामाच्या बारीक सारीक माहितीचे संकलन करावे लागणार होते, संबंधित फोटो गोळा करून त्याचे पॉवर पॉइंट प्रेझेन्टेशन करायचे होते त्यासाठी ते कसे करायचे हे आधी शिकावे लागणार होते तरच सगळ्यांसमोर मांडता येईल ... त्यावर काम करायला हवे होते.



ठरवल्या पासून साधारण एक दीड महिना कालावधी हातात होता. या काळात सगळा विभाग तेच काम करत होता. जुन्या धारिण्या, जुनी वृत्ते काढून विषयवार माहिती गोळा करणे चालू झाले. जुने फोटो स्कॅन करून फोल्डर्स बनवली जात होती. दहा वर्षात केलेल्या नुसत्या उपक्रमांची यादी केली तर चारशेच्या वर गेली! किती विषय सोडून दिले तेही वृत्तात सापडले! मग चर्चा सुरु झाली की परिणाम कशाचा झाला?... काय टिकलं?... का टिकलं? सगळ्यावर चर्चा झाल्या. प्राधान्य कसे ठरवायचे यावर फैरी झाडल्या गेल्या. एकेका विषयावर दोन-दोन तास बोलता येईल एवढा मजकूर या मंथनातून मिळाला! १० वर्षांच्या माहितीचे संकलन करणे सुद्धा किती अवघड असते,



स्वतःच्या कामाकडे त्रयस्थ नजरेतून बघण्यासाठी वेगळीच क्षमता असावी लागते ते कळत होते. एरवी गावोगाव फिरून सुद्धा न दमणारा गट हे सगळं करताना कार्यालयात बसून थकून जात होता. आपणच आपला इतिहास लिहितोय अशी काहीशी भावना गटाची होती.

हे सगळे करताना असे लक्षात आले, की ज्यांच्या सोबत, ज्यांच्यासाठी काम केले त्यांना सुद्धा हे सगळं सांगायला हवं. असं केलं तर त्यांना सुद्धा त्यांच्या विकासाचा हा प्रवास पुन्हा एकदा नव्याने अनुभवता येईल. 'आठवते का? आपण केले तेव्हा आपल्याला असे वाटत होते.... ' असं सांगावं लागेल. या गटाला वेगळ्या पद्धतीने सांगावे लागेल तर ज्यांच्या मार्गदर्शनाने, ज्यांच्या सदिच्छांमुळे काम केले त्यांच्यासाठी कामाची मांडणी वेगळ्या पद्धतीने करावी लागेल. मग मांडणीसाठी बचत गट, स्वयंरोजगार, आरोग्य, नेतृत्व विकसन, हिरकणी-बालवाडी-दल उपक्रम, किशोरी विकास, युवती विकास व एकत्रित कार्यकर्ता घडण असे ८ विभाग निश्चित केले. परिसंवादाचे दोन भाग केले. पहिला गुंजवणी खोऱ्यातल्या आंबवणे गावी तर दुसरा पुणे प्रबोधिनीच्या वास्तूत!

पहिले सादरीकरण आंबवणे येथे निवडक ९३ जणीं समोर केले, ज्या आजही गावातच रहातात, अनेक उपक्रमांच्या त्या संयोजक किंवा सहभागी होत्या अशांसमोर केले. या गटात सादरीकरणा नंतर श्रोत्यांनी केवळ श्रोते न रहाता 'कामाची पुढील दिशा कशी असावी?' या वर गटागटात चर्चा करून किमान १५ मुद्दे नोंदवायचे असे सांगितले. परिसंवादातून सगळी माहिती एकत्र मांडल्यामुळे अनेकींना आपला प्रवास कसा झाला ते लक्षात आले, त्यामुळे असे गावातल्या इतर अनेकींसाठी करण्याची आवश्यकता वाटून पुढचे नियोजन त्यांनी खूपच हिरिरीने केले. एवढेच नाही तर नियोजन केलेल्या उपक्रमाची जबाबदारी सुद्धा घेतली.

दुसरे सादरीकरण पुणे प्रबोधिनीत प्रबोध सभागृहात झाले. ज्यांच्या मार्गदर्शनाने, ज्यांच्या सदिच्छांमुळे काम केले त्यांच्यासाठी! पुणे प्रबोधिनीतील इतर विभागातले ४-५ ज्येष्ठ मार्गदर्शक, अन्य केंद्रांवरचे निवडक सदस्य यांच्या समोर कामाची मांडणी केली. त्याला कार्यकर्त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनाही आवर्जून बोलावले होते.

दिवसभर झालेल्या या परिसंवाद सादरीकरणात टप्प्याटप्प्यात १३२ जण उपस्थित होते. ज्येष्ठ मार्गदर्शक व देणगीदार श्री अनंतराव सेटलवाड, मा. संचालक, मा. कार्यवाह उपस्थित होते तर डॉ. विवेकराव कुलकर्णी, सविताताई, सुजलाताई, अनघाताई, अजितराव असेही अनेक मार्गदर्शक कार्यक्रमास उपस्थित होते. तर देणगीदार, हितचिंतक व काही संस्थांचे प्रतिनिधी सुद्धा निमंत्रणामुळे आले होते. या सादरीकरणात मूळ सादरीकरणा शिवाय पुढे काय करायचे ठरवले आहे अशी ताजी भर सुद्धा घातली होती.या सादरीकरणात बचत गटापासून सुरू झालेले हे काम आता किशोरी, युवती, नवीन सुना यांच्या पर्यंत कसे पोचले आहे हे सुद्धा त्यानिमिताने सांगितले. अगदी गरोदर पणापासून म्हणजे जन्मापूर्वी पासून ज्येष्ठ महिले पर्यंत प्रत्येक वयोगटासाठी विविध गरजेवर आधारित उपक्रमाची योजना कशी करत गेलो हा उपक्रमपट मांडला.

दोन्ही वेळा सादरीकरण करणाऱ्या बहुतेक जणी या केवळ उपक्रमाची मांडणी करणाऱ्याच नव्हत्या तर त्या उपक्रमाच्या संधीतून स्वतः घडल्या होत्या. त्यामुळे मांडणीत केवळ माहिती नव्हती तर अनुभवकथनाचा भागही होता. एकीने विषय मांडला असला तरी तिच्या पाठीशी तिच्या बरोबरीने काम करणाऱ्या दोघी जणी व्यासपीठावर होत्या व नंतर झालेल्या प्रश्नोत्तरात त्याही सहभागी झाल्या होत्या.

या आत्मप्रचिती परिसंवादामुळे, सादरीकरण केलेल्या गटाचा वाढलेला आत्मविश्वास, कामातली तळमळ लक्षात आली. एकत्रित सादरीकरणामुळे अनेक हितचितकांना कामाचा वाढलेला आवाकाही जाणवला. हे काम कुण्या 'सांगकाम्याने केलेले नाही' तर करणाऱ्याच्या प्रेरणेचा प्रवासही सूज्ञांच्या लक्षात आला. काम करणारा गट किती आत्मीयतेने काम करतोय, त्या उपक्रमातून कसं शिकत जातोय हे कळले. परिसंवादामुळे ते घडवणाऱ्या गटाचा वैयक्तिक परीचयही झाला.

या निमित्ताने गेल्या दशकाच्या कामाचे संकल झाले व मांडणी करणाऱ्या गटाचा कामावरचा विश्वास द्विगुणीत झाला हे वेगळे सांगायला नको!


**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**

**'ज्ञान प्रबोधिनी' या नावाने धनादेश काढावा**

संपर्क : **ज्ञान प्रबोधिनी : स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण),**
५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरभाष : ०२० २४२०७१६२/१३३

★ **शिवापूर** : खेड-शिवापूर वाडा, ता. हवेली, जिल्हा पुणे, ४१२२०५

★ **आंबवणे** : मातृछाया, ता. वेल्हे, जिल्हा पुणे ★ **वेल्हे** : पोलिस स्टेशन जवळ, ता. वेल्हे, जिल्हा पुणे